शुक्रवार, १६ जून २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२७४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●FRIDAY 16 JUNE 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-274 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5


# बिपरजॉय पावसासाठी पूरकच

## आज सायंकाळी चक्रीवादळ धडकेल जाखू बंदरात

आधुनिक केसरी न्यूज

नवी दिल्ली : बिपरजॉय चक्रीवादळाचा वेग मंदावला आहे. मागील तीन दिवसांपासून चक्रीवादळाची अधिक हालचाल झालेली नाही. गुजरातसह महाराष्ट्रात या चक्रीवादळाचा परिणाम दिसून येत आहे. या दोन्ही राज्यातील अनेक जिल्ह्यात वादळी वाऱ्यांसह पावसाने बुधवारी हजेरी लावली आहे. बिपरजॉय चक्रीवादळ गुजरातच्या किनारपट्टीकडे वाटचाल करीत आहे. चक्रीवादळ गुरुवारी सायंकाळी चार ते रात्री आठ वाजण्याच्या दरम्यान जाखू बंदराच्या उत्तरेकडील भागात धडकेल. चक्रीवादळ मोसमी पावसासाठी पूरकच ठरले आहे, अशी माहिती हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी दिली.

## आईने मुलीच्या शिक्षिकेस लिहिलेलं पत्र

***प्रिय बाई,***

आज माझी अतिशय गोड, प्रेमळ मुलगी बघता बघता सहा वर्षांची झाली. बरीच अधुरी राहिलेली स्वप्ने मला तिच्या रूपात साकारायची आहेत. अतिशय उमेदीने आणि उत्साहाने तिचं नाव तुमच्या शाळेत दाखल करत आहे. माझी लेक उद्यापासून खूप रंगीबेरंगी स्वप्नं उराशी बाळगून तुमच्या ज्ञानमंदिरात पदार्पण करणार आहे. पण पडलेली सर्वच स्वप्नं काही फळाला येत नसतात. हेही कळेल तिला कधी ना कधी..! मात्र स्वप्न बघण्याची दूरदृष्टी तू कधीच हरवू नकोस, हे तुम्ही तिला नक्की शिकवा. संकटावर मात करून परिस्थितीशी दोन हात करत गरूडासारखी उत्तुंग भरारी घेण्यासाठी जिजाऊ, सावित्री, रमाई, अहिल्या यांचीही प्रेरणा तिला द्या. मला जाणीव आहे की परिवर्तन हे काही एक दिवसात होत नाही. पण तरीही तिला सांगा की स्वतःचे हक्क, स्वातंत्र्य हे काही ताटात आयतं वाढून किंवा मागून मिळत नसतं. तर स्वतःचं स्वातंत्र्य हे स्वतःलाच सिद्ध करावं लागतं. आपल्यातील आत्मविश्वास, कल्पना, विचार



यांच्या जोरावर ठाम राहून निर्णय घ्यायला सांगा तिला. निर्णय चुकतात म्हणून काय घ्यायचेच नाहीत का ? चुकांमधलाही अंगार उचलून त्याचा शृंगार करायचा असतो, हे अवश्य सांगा तिला. माझी लेक खूप हळवी व भावनिक आहे हो! भावनिक असणं काही अयोग्य नाही...पण भावनेच्या डोहात बुडून न जाता वास्तविक सत्यतेच्या विचारांवर तरंगायला शिकवा तिला. त्याचबरोबर हेही पटवून द्या तिला की, जीवनात स्वार्थीवृत्तीने फक्त भौतिक सुख मिळवता येतं. पण स्वतःशी प्रामाणिक राहून आत्मिक, सुख, समाधान कसं मिळवता येईल हेही शिकवा. 'देहाकडून देवाकडे जाताना मध्ये देश लागतो' आणि या देशाचे, समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो याचे भान ठेवून सामाजिक बांधिलकी जपत संधीच सोनं करायला सांगा तिला..! स्वतःच्या उत्कर्षाचा प्रयत्न जरूर करावा तिने..पण आपल्या वंचित बांधवांचा तिला कधीही विसर पडू नये. स्पर्धेपेक्षा महत्त्वाचं असतं ते सहकार्य..! हे पटवून सांगा तिला..आणि हो वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगून भूलथापांना, अंधश्रद्धा, कर्मकांडाला फाटा देऊन वास्तविक सत्यावर विश्वास ठेवून वाटचाल करायला मात्र नक्की सांगा..! धन्यवाद बाई! नाही म्हणता-म्हणता मी खूपच जबाबदारी टाकली आहे तुमच्यावर..! पण तुम्ही एकट्या नाही तर तुमच्याबरोबर मीही यात असणार आहे. कारण माझ्यातली आई आणि तुमच्यातील शिक्षिका आपल्या दोघींना मिळून तर घडवायचं आहे तिचं, आपलं आणि आपल्या देशाचं अखंड प्रज्वल असं भव्यदिव्य भवितव्य...!!

**कल्पना कल्याण घुगे, जालना.**


# 'ही' युती स्वार्थासाठी झाली नाही : मुख्यमंत्री शिंदे


आधुनिक केसरी न्यूज



**पालघर :** 'राष्ट्रात मोदी आणि राज्यात शिंदे' या जाहिरातीवरून महायुती सरकारमध्ये वादळ निर्माण झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. या जाहिरातीनंतर भाजपाने शिंदे गटातील नेत्यांना जाहीर इशाराही दिला होता. त्यानंतर, 'गर्जा महाराष्ट्र माझा'च्या जाहिरातीने या प्रकरणाचा उत्तरार्ध करण्यात आला. या सर्व प्रकरणात एकनाथ शिंदे यांनी उघड भूमिका जाहीर केली नव्हती. पालघरमध्ये आज झालेल्या 'शासन तुमच्या दारी' या कार्यक्रमात गुरुवारी त्यांनी जाहिररीत्या याबाबत भाष्य केले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत असलेल्या मैत्रीचाही उल्लेख त्यांनी केला. एकनाथ शिंदे म्हणाले की, शासन आपल्या दारी कार्यक्रमातील गर्दी पाहून विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. त्यांना धडकी भरली आहे. पोटदुखी सुटली आहे. ही युती झाली ती स्वार्थासाठी झाली नाही. सत्तेसाठी झाली नाही. गेली २५ वर्षे वैचारिक भूमिकेतून युती झाली. बाळासाहेब ठाकरे, अटलबिहारी वाजपेयी, प्रमोद महाजन आणि गोपीनाथ मुंडे यांचे विचार आणि आता देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली सरकार काम करते. मधल्या काळात मिठाचा खडा टाकला होता. पण तो मिठाचा खडा आम्ही उचलून फेकून दिला. त्यामुळे काहीह म्हटले तरी आमच्यात दरी निर्माण होऊ शकत नाही. कारण हे सरकार एका विचाराचे सरकार आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले. माझी आणि देवेंद्रजींची आताची दोस्ती नाही. गेल्या १५-२० वर्षांपासून दोस्ती आहे. ही दोस्ती जिवाभावाची मैत्री आहे. ये फेविकॉल का जोड है, तुटेगा नही. तुटणार नाही. कितीही प्रयत्न केला तरी. काही म्हणतात जय विरू की जोडी, काहीजण धरम-वीरची जोडी. ही जोडी खुर्चीसाठी, स्वार्थासाठी झालेली नाही. स्वार्थासाठी एकत्र झाले होते त्यांना सामान्य जनतेने बाजूला केले, असा टोलाही शिंदेंनी यावेळी लगावला.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

म्हणजे सखे आजपासून तू मला माझ्या प्राणांपेक्षाही प्रिय आहेस. जुन्या हिंदी चित्रपटात हाच नायक राहवत नाही म्हणून दररोज आपला तिच्या घराजवळ जाऊन शिटी वाजवून तिला साद घालतो. भगवान दादांच्या अलबेला या चित्रपटातला हा नायक. मग त्याला उद्देशून नायिका म्हणते शाम ढले खिडकी तले तुम सिटी बजाना छोड दो तर हिंदी चित्रपटातल्या एखाद्या नायकाला ही संध्याकाळची वेळ धुंद, मदहोश करणारी वाटते. त्याला प्रेयसीची ओढ लागलेली आहे. तिच्याशिवाय राहणे त्याला शक्य नाही. अशा वेळी तो म्हणतो ' ये शाम मस्तानी, मदहोश किये जाय मुझे डोर कोई खिंचे 'तेरी ओर लिये जाय...' संध्याकाळ म्हटली की मला ' सांज ये गोकुळी सावळी सावळी ...' हे गाणं हटकून आठवतं. संध्याकाळचं जेवढं रम्य शब्दचित्र या कवितेत आहे, तेवढे क्वचितच कुठे आढळते. वजीर चित्रपटातलं सुधीर मोघे यांचं हे गीत आशा भोसलेंनी गाऊन अजरामर केलं आहे. या गीताची तीनही कडवी अप्रतिम आहेत. पहिल्या कडव्यात वी म्हणतो धूळ उडवीत गाई निघाल्या, श्याम रंगात वाटा बुडाल्या. परतती त्या सवे पाखरांचे थवे, पैल घंटा घुमे राउळी. दिवसभर चरण्यासाठी बाहेर पडलेली गायी गुरे आता आपल्या घराच्या ओढीने निघाली आहेत. घरी परतण्याचे त्यांचे रस्ते आता अंधारताहेत असे न सांगता कवी मोठे सुंदर शब्द वापरतो. तो म्हणतो ' श्यामरंगात वाटा बुडाल्या. ' श्रीकृष्ण, श्रीराम, विष्णू हे सगळे देव सावळेच ! कृष्णाला तर आपण प्रेमाने ' श्याम ' म्हणतो. संध्याकाळ तर त्याच्याच रंगात रंगून जाते. पाखरे घरट्याकडे निघालेली असतात आणि दूरवर मंदिरातून घंटेचे मंजुळ स्वर कानी येतात. दुसऱ्या कडव्यात कवी म्हणतो पर्वतांची दिसे दूर रांग, काजळाची जणू दाट रेघ होई डोहातले चांदणे सावळे, भोवती सावळ्या चाहुली... दूरवर दिसणारी पर्वताची रांग या संध्यासमयी कशी दिसते, तर जणू काजळाची दाट रेघ असल्यासारखी. अंधारून आले आहे. पर्वत आता धूसर होताहेत असे न सांगता कवी त्याला काजळाच्या रेघेची उपमा देतो आणि संध्येचे सौंदर्य आणखी खुलते.




## आनंदी पहाट



## अंतरात्म्याला ओळखता येणे आवश्यक

आधुनिक केसरी

आपल्या अंतरंगात डोकावणे, हे कदाचित प्रयास देणारी प्रक्रिया वाटेल, परंतू तो जीवनाचा प्रवास समजून करत राहण्याची आवश्यकता आहे. आपल्या अंतरात्म्याची ओळख त्या माध्यमातून होणे शक्य होऊ शकते. त्याला



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

निश्चितच योगाभ्यासाची जोड द्यावी लागेल. जेणेकरून आपला अंतरात्म्याचा शोधा अधिक सुकर होऊ शकतो आणि आत्मनिर्भर होण्यासाठी तो अत्यंत जरुरीचा देखील असतो. ह्या विषयाकडे आपणा योगाभ्यासातून

अध्यात्माचा विचार करण्याची आवश्यकता असते. ह्या अध्यात्माचा संबंध कोणत्याही धार्मिक दृष्टीकोनातून न जोडता त्याच्याकडे आपण योगशास्त्र ह्याच दृष्टीकोनातून बघितले पाहिजे. आपण आत्मनिर्भर होण्यामुळे आपला आत्मविश्वास वाढीस लागतो, आपण स्वावलंबी बनत जातो, आपण

सर्वसामान्य न राहता सर्वार्थाने समृद्ध होत राहतो, स्वतःचा आधार आपण स्वतःच होत राहतो, प्रत्येक गोष्टीत सहभागी होऊन त्यामध्ये स्वतःला समाविष्ट करण्याचे आपण धैर्य निर्माण करत राहतो. आपले अंतर्मनच आपले मार्गदर्शक असते, तेच आपल्याला आत्मनिर्भर बनवू शकते. त्यासाठी सर्वप्रथम आत्मनिष्ठ होणे जरुरीचे असते. आपल्या आत्मनिष्ठतेमुळे आपल्यात नवचैतन्य, नवी उमेद, नवा उत्साह आणि नवा जोश निर्माण होत असतो. आत्मविश्वास वाढीस लागण्याची सुरुवात ह्याच प्रकारे होत राहते. ह्यासाठी आपण आपल्या अंतर्मनाला सक्षम करण्याची, त्याची कार्यक्षमता वाढवण्याची जरुरी असते. आपले

अंतर्मनच आपला गुरु आणि मार्गदर्शक म्हणून कार्यरत होत राहते. गुरु आणि गुरुतत्व ह्याबद्दलची ओळख मूळ तत्वापासून केली जाते. त्यात गुरु आणि गुरुतत्व यातील फरक तसेच तत्व म्हणजे काय ह्याचे महत्वही समजून घेतले पाहिजे. सध्याचे मानवी जीवन असे विस्कळीत झाले आहे, हे शास्त्रीय मीमांसेतून स्पष्ट होत असतेच, परंतू त्याच्याकडे अनकेदा दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते.



आधुनिक केसरी

**ज्ञानाने दावले | दिव्य तेज ||**

जोडावी रे नाळ | बुध्दीने ज्ञानाशी ||
आचार कर्माशी | शुद्ध ठेव ||१||
विकारांचे पोटी | अज्ञान जन्मते ||
पातक घडते | घडो घडी ||३||
महिमा संतांचा | मनाशी कळावा
आत्म्याशी जुळावा | आत्माराम ||२||
कर्मगती सांगे | सुख-दुःख क्षेम ||
हरिपाठ नेम | चूकून नये ||४||
मौनाने साधावा | ज्ञानाशी संवाद ||
इंद्रायणी साद | घाली मना ||५||
अद्वैताचे ठायी | द्वैत लुप्त झाले ||
ज्ञानाने दावले | दिव्य तेज ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

**मत्वाज्ञं बालकं मातः क्षन्तव्योऽहं त्वया खलु | तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || २१ || हे माते मला अज्ञानी बालक समजून तुझ्याकडून क्षमा केली जावी. मी तुला दुर्गा देवीला तीनही तापांच्या शांतीसाठी नमन करतो.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**अरटु पत्र सम सन्त जन, रहत सदा जग माहिं । मन मन में जन हरि रहें, अद् भुत भेद समाहिं ।।०९।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल दशम अध्याय) ०४/१०/०९ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :** अळवाच्या पानाप्रमाणे संतजन सदैव संसारात राहूनही त्यापासून असंग असतात. अळूच्या पानावर पाणी राहात नाही तद्वतच वैराग्यवान गृहस्थाश्रमी संतावर मायेच्या प्रपंचाचा प्रभाव आतून पडत नाही. ते त्यापासून असंग राहून स्वतःच्या आनंदात निमग्न असतात. त्यांच्या मनाच्या मनात म्हणजेच आत्म्यात प्रभू राहात असतो. ते अद्भूत योग-भेदाद्वारे त्या परमेश्वरामधे सदैव अंतर्मुख राहातात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## सूक्ष्मभूतेंनिरूपण

आधुनिक केसरी

आकाश हे अनंत अनादी आहे. त्याची लांबी रूंदी ही मोजत बसण्यापेक्षा ते कसे सर्व व्याप्त आहे याचा विचार करू खरं तर समर्थाचं वाङःमय हे चारशे वर्षापासून समाज प्रबोधन करत आले आहे. मला सांगा मित्रांनो आकाश कधी म्हणतं का ? की मी अमक्याला सावली देईन तमक्याला ऊन देईल ? असं कधीही होत नाही. मगं पंचभूतांचा विचार अनेक संतांनी थोर महात्म्यांनी केला आहे तर मनातील हे विद्वेशाचं मूळ नष्ट करून संत साहित्याचा विचार केला तर समाज सुखी होईल आणि समाज सुखी व्हावा ज्ञानसंपन्न व्हावा.हे तर संताच्या विचारांचं मूळ आहे. संतांनी रागलोभ मदमस्त, दंभाचार, खोटेपणा, अतिलोभ हे सर्व




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

दोष काढून टाकायला सांगितले आहे. आज तर प्रत्यक्ष परब्रम्हाच्या भेटीसाठी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व जगत् गुरू तुकाराम महाराजांच्या पालख्या पुणे मुक्कामी आहे. हजारो वर्षांपासून या पालख्या समतेचा ,बंधुभावाचा,एकीचा संदेश देत देत पंढरपूरला ऊनपावसाची तमा न बाळगता पंढरीच्या पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी जात आहेत. तो व्हा आकाश या शब्दाचा अर्थ तुम्हाला कळला असेल. आकाश हे सर्व व्याप्त सर्वांना सामावून घेणारे विशाल आहे. संताच्या सांगण्याचा मतितार्थ तुम्हाला कळला असेल की.

## विषयाकडचा ओढा भगवंताकडे लावावा

आधुनिक केसरी

प्रपंचात ज्याला विश्वास म्हणतात, त्यालाच परमार्थात श्रद्धा म्हणतात. उणीव हेच प्रपंचाचे रूप असल्यामुळे तो पूर्ण झाला असे कधीच होणार नाही. समाधान हा मात्र पूर्णत्वाचा स्वभाव आहे. निर्हेतुक कर्म करण्याने खरी सात्विकता उत्पन्न होईल. आणि पुढे पूर्णाहुती दिली जाईल. अशा प्रकारे 'सर्वस्व' अर्पण करणे, याचेच नाव यज्ञ होय. त्याग आणि भगवंताचे स्मरण, हा यज्ञाचा खरा अर्थ होय. परमार्थ साधला की बुवाचा देह पुष्ट होतो. तो काय दुधाचा रतीब लावतो ? छेः; भगवंताच्या आनंदाने त्याचा देह भरलेला असतो; परंतु साधकावस्थेमध्ये त्याचा देह कष्टामध्येच ठेवलेला असतो. खरे म्हणजे, परमार्थी माणसाने दैन्यवाणे राहायचे कारणच नाही. पैसा असेल तर त्याने रोज श्रीखंडपुरी खावी; पण उद्या जर उपास पडला, तर मात्र आजच्या पक्वान्नाची आठवण होता कामा नये. सर्वांत गृहस्थाश्रम श्रेष्ठ सांगितला आहे. ज्याला हित करून घ्यायचे आहे, त्याला गृहस्थाश्रमासारखा आश्रम नाही. पण लग्न



करून सर्व काळ विषयांत घालवू लागलो, आणि प्रपंचाची कर्तव्ये करायची राहिली, तर मग लग्न करून काय साधले ? उद्योग करून पोट भरायचे हे खरे, पण नोकरी करून मालकाला सर्वस्व मानू लागलो आणि देवाला विसरलो, तर नाही उपयोग. देवाला स्मरून नोकरी करावी. गृहस्थाश्रमात देव भेटणार नाही असे म्हणेल, त्याचे खरे मानू नये. देव भेटेल याची खात्री बाळगावी. आपला भार सर्वस्वी भगवंतावर टाकावा. संकट, आनंद, दोन्ही भगवंताला सांगावीत. ज्या स्थितीत भगवंताने ठेवले आहे त्या स्थितीत समाधान मानावे. अर्पणबुद्धीने सर्व कर्मे करावीत. ज्यात माझे मन मला खात नाही, ते काम चांगले असे समजावे. कोणत्याही मनुष्याला जोपर्यंत या प्रपंचामध्येच सर्व काही आहे असे वाटत असते, तोपर्यंत तो परमार्थापासून दूर असतो. वाईट लोक समाधानात दिसतात, पण खरे ते तसे नसतात. वाईट कृत्ये करणाराला कधी ना कधी तरी पश्चात्ताप झाल्यावाचून राहात नाही. एखादी बाई आपल्या सावत्र मुलाला ज्याप्रमाणे खायला प्यायला घालते, पण आतून तिचे त्याच्यावर प्रेम नसते, त्याप्रमाणे आपण परमार्थाला वागवतो. खरे म्हणजे आपले इथेच चुकते. आपला ओढा जो विषयाकडे आहे, तो भगवंताकडे लावला की परमार्थ साधला. ज्याने विषयातले सुख भगवंताकडे लावले, म्हणजे भगवंताच्या स्मरणात ज्याला सुखा-समाधानाचा लाभ झाला, त्याचे जन्माला येऊन खरे कल्याण झाले.

**१६०. प्रपंचात जी आपली चिकाटी आहे. तिच्या एकचतुर्थांश चिकाटी जरी भगवंतासाठी आपण धरली, तरी आपले काम भागेल.**

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**आशा नाम मनुष्याणां काचिदाश्चर्यशृंखला |**
**यया बद्धाः प्रधावन्ति मुक्तास्तिष्ठन्ति पङ्गवत् ।।**
**सरलार्थ - आशा (हाव, अतिलोभ) नावाची माणसाच्या पायात अडकवलेली आश्चर्यकारक बेडी आहे. ती पायात पडली की माणसे सैरावैरा धावत सुटतात. (पण ) जया बेडीतून सुटतात ते पंगू माणसाप्रमाणे एका जागी शांत, स्तब्ध असे बसून राहतात..**
**स्पष्टीकरण - माणसानं यश, कीर्ती, वैभव मिळवण्याची आकांक्षा अवश्य धरावी. त्यासाठी प्रयत्नही करावे. पण कोणत्याही गोष्टीचा अतिलोभ धरून सैरावैरा धावू नये. अतिलोभामुळे शेवटी माणसाची फसगतच होते.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे




शिंदेसाहेब, ही जाहिरात तयार करणाऱ्याला 'महाराष्ट्र-भूषण' द्या!
पान ८

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, १६ जून २०२३



अलंकापुरीत पोलीस व वारकऱ्यांविषयी भक्तीभावे राजकारण ?
पान ९


## चर्चकांचं म्हणणं गांभीर्यानं घेऊ


कधी येणार गा पाऊस...? मान्सून लांबल्याने चिंता वाढली

प्रिय बाळासाहेब !
सुप्रभात !

चित्रकार आणि सुबोध लेखक भोकरच्या बाबुराव पाटील सरांना आज फोटोत पाहिलं आनंद वाटला बाळासाहेब. आजच्या चर्चासत्रातील त्यांची मतं भाषिक आणि वैचारिकदृष्टीनं काव्यात्मक आहेत. पाणी जीवन आणि शेतीशी निष्ठा सांगणारी त्यांची मांडणी सुंदरच आहे हो.
डॉ. सतीष मस्के महोदयांना पावसाचा लहरीपणा जाचतो आहे. त्यामुळं गोरगरीबांचे हाल होतात ही त्यांची नोंद महत्वाची आहे.वसंत राठोड यांनी बालकवीच्या कवितेतलं बालपण पावसामुळं हिरावून गेल्याची खंत व्यक्त करत आरती प्रभूंच्या "ये रे घना !" ची आळवणी करताहे. वसंत डोंगरदिवे यांनी नको तेंव्हा पडणाऱ्या पावसाचा कान धरुन हवा तेंव्हा का पडत नाहीस हा रोष व्यक्त केला आहे. ते वृक्षसंवर्धनाची आवश्यकता अधोरेखीत करतात. आपणंच झाडांची निष्ठूर कत्तल करुन सिमेंटचे जंगलं उभे केले आणि पाऊस पळवून लावल्याचा खेद सीमा देशमुख मांडतात.
आपणंच निर्दयीपणे निसर्गाशी वागत आलोत, त्यामुळं पाऊस लांबणीवर पडत चाललायं, सालोन् साल हा सूर या चर्चेतून समोर आला आहे.
या सगळ्या चर्चकांचं म्हणणं गांभिर्यानं घेऊन आपण या पावसाळ्यात वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाकडं गांभिर्यानं बघायला हवं, हेच महत्वाचं.
या चर्चा सत्रात सहभागी सर्व मान्यवरांचं हार्दिक अभिनंदन आणि संयोजक बाळासाहेब जोंगदंड आणि वृत्तपत्राचे संपादक डॉ. गोरे सरांचे हार्दिक अभिनंदन !

आपला,
डॉ. मुकुंद राजपंखे, अंबाजोगाई
मो. 9881294226

# तपोवनात पेटवली चाऱ्याची गंजी

## ५ लाखांचा चारा जळून खाक; जनावरे बालंबाल बचावली

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** भोकरदन तालुक्यातील तपोवन येथील गट नंबर १५ मधील ओंकार माणिकराव कढवणे यांच्या शेतात शनिवारी रात्रीच्या ११ च्या सुमारास अज्ञात व्यक्तीने चाऱ्याच्या गंजीस आग लावून पसार झाल्याची घटना घडली. यामध्ये चाऱ्याची गंजी खाक होऊन शेतकऱ्याचे पाच लाखांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. स्थानिक शेतकऱ्यांच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळविले. अन्यथा संपूर्ण परिसरात आग पसरून मोठे नुकसान झाले असते. अज्ञात व्यक्तीविरुद्ध हसनाबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून गुन्हेगारास अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.
शेतकरी ओंकार कढवणे यांनी शेतात जनावरांना वर्षभर पुरेल एवढा चारा साठवून ठेवला होता. यामध्ये पाच ट्रॅक्टर भूस आणि ७५० कडब्यांच्या पेंढ्यांचा समावेश होता. परंतु अज्ञात व्यक्तीने खोडसाळपणातून तार कंपाऊंडच्या आत घुसून अंधाराचा फायदा घेत गंजीस आग लावून पळ काढला. ज्ञानेश्वर कढवणे हे लघुशंकेस उठले असता त्यांना गंजी पेटल्याचे दिसले. त्यांनी तात्काळ फोनवरून ओंकार कढवणे यांना ही माहिती दिली. माहिती मिळताच ओंकार कढवणे



घटनास्थळी दाखल झाले. तपोवन शिवारात या अगोदरही जाळपोळीच्या अनेक घटना घडल्या आहेत.त्यामध्ये ओंकार कढवणे यांचे ठिबक पेटवून दिले होते. रामनाथ मालुसरे आणि राजेंद्र मालुसरे यांचे शेडनेट अज्ञात व्यक्तीने जाळून टाकले होते. तर विश्वंभर मालुसरे या शेतकऱ्याची सोयाबीनची गंजी पेटून दिली होती. त्यामुळे तपोवन शिवारात खोडसाळपणातून जाळपोळीच्या घटना घडत असल्याचे म्हटले जात आहे.
चाऱ्याच्या गंजीस लागलेली आग इतकी भीषण होती की काही क्षणातच चारा आणि भूसा जळून खाक झाला. आगीमुळे सभोवतालची झाडे होरपळून निघाली. कडबा गंजीच्या बाजूला जनावरे बांधलेली होती. सुदैवाने आग तिकडे पोचली नाही म्हणून जनावरे वाचली.
यासंदर्भात हसनाबाद पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध तक्रार दाखल केली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक वैशाली पवार करत आहेत.आरोपीचा शोध घेऊन तात्काळ अटक करण्याची मागणी शेतकरी करत आहेत. या घटनेची माहिती मिळताच राजूर येथील व्यापारी संघटनेचे अध्यक्ष-सारंगधर बोडखे,उपाध्यक्ष- सुखानंद पारवे,सचिव-रामेश्वर कढवणे,सहसचिव-चंदुमामा नागवे,सामाजिक कार्यकर्ते प्रा.बाळासाहेब बोराडे यांनी घटनास्थळी भेट देऊन या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी पोलीस प्रशासनाकडे केली आहे.

## एकनाथ शिंदेंचे महत्त्व जाणावे : बच्चू कडू

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती:** एकनाथ शिंदे यांनी जर उठाव केला नसता तर भाजप सत्तेत आलेच नसते. त्यामुळे भाजपने शिंदेंचे महत्त्व जाणावे, असा खोचक सल्ला आमदार बच्चू कडू यांनी भाजपला दिला आहे. माध्यमांशी बोलताना बच्चू कडू म्हणाले की, एकनाथ शिंदे यांनी चाळीस आमदारांसह उठाव केला. त्यांच्या बलिदानामुळे भाजप आज सत्तेत आले आहे. याची जाणीव त्यांनी ठेवून शिंदेंचे महत्त्व लक्षात घ्यावे, नाहीतर पुढील पाच वर्षे जर उद्धव ठाकरे यांचे सरकार राहिले असते तर भाजपमधील १०५ आमदारांची संख्या पुढे ५० ते ६० वर आली असती. त्यामुळे शिंदेंसह त्यांच्या सहकाऱ्यांचे महत्त्व लक्षात घेणे गरजेचे आहे. आम्ही राजकीय लोक खुजे नसतो. नेत्यांना मोठे मन ठेवावे लागत असते. माध्यमांमध्ये त्यांची चर्चा होत असते. केंद्रात २४ पक्षांचे सरकार एकत्र काम करू शकते. पण, गावात दोन गट एकत्र बसण्यास तयार नसतात. त्यामुळे बड्या नेत्यांना फार काळजीपूर्व काम करावे लागते, असे बच्चू कडू म्हणाले. एकनाथ शिंदे असे एकमेव मुख्यमंत्री आहेत. ज्यांच्या बंगल्यावर रात्री बारा ते एक वाजेपर्यंत लोक मदतीसाठी येतात. ते देखील त्यांना हवी ती मदत करतात, असे कौतकोद्गार बच्चू कडू यांनी काढले. अनेक ठिकाणी विकासकामासाठी जाणीवपूर्वक त्रास दिला जात आहे. वरिष्ठांकडून त्रास दिला जात नाही. पण, स्थानिक पातळीवर आमदार-खासदारांना त्रास होत आहे, त्यामुळे त्याची खबरदारी भाजपने घ्यावी, अशी टीका कडू यांनी केली. बनावट बियाणे, खते आली, परंतू या प्रकरणांमध्ये दोषींवर कारवाई होत नसेल तर सरकारचा फायदा काय, आमदार, खासदार, मंत्री, सचिव, कृषी अधिकारी सर्व आहेत. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांवर कारवाई होत नसेल तर यंत्रणेचा उपयोग नाही, असेही कडू म्हणाले.

## माजी आमदाराच्या वाहनावर हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** सत्ताधारी शिंदे गटाचे जिल्ह्यातील नेते तथा सिंदखेडराजा मतदारसंघाचे माजी आमदार शशिकांत खेडेकर यांच्या वाहनावर रेती माफियांनी हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी चिखली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. १० जूनच्या रात्री साडेसात वाजता मेहकर फाटा परिसरात ही घटना घडल्याचे १३ जूनच्या रात्री उशिरा दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. यावेळी शशिकांत खेडेकर यांचे सुपुत्र श्रीनिवास खेडेकर आपल्या आईसह वाहनात होते. ऊळगाव राजा येथील लग्न समारंभ आटोपून श्रीनिवास खेडेकर बुलडाण्याकडे जात होते. त्यावेळी मेहकर फाटा परिसरात अज्ञात रेतोमाफियाने लोखंडी रॉडने वाहनावर हल्ला चढवला. या हल्ल्यात त्यांच्या स्कॉर्पिओ कारच्या समोरील काचा फुटल्या आहेत.

## आ. फारुख शाह यांच्या हस्ते रस्ते कामाचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील अल्पसंख्याक भागात मुलभूत सुविधा जसे रस्ते,गटारी,पाण्याची पाईप लाईन यासाठी आजपर्यंत लोक प्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्यामुळे या भागाचा विकास थांबलेला होता. कॉलनी व वस्त्यांमध्ये रस्ते नसल्यामुळे पावसाळ्यात नागरीकांचे हाल होत होते. त्या सगळ्या गोष्टींचा आमदार फारुख शाह यांनी अभ्यास करून ज्या भागात रस्ते नाही. गटारी नाही,पाईप लाईन नाही. यासाठी निधी उपलब्ध करून कामाचा सपाटा लावलेला आहे.शहराच्या दक्षिण भागात असलेल्या शिफा क्लिनिक व हिदायत मस्जिद परिसराती नागरिकांनी मागणी केल्यानुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाआभियान अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण करण्यासाठी ५० लक्ष चा निधी आ.फारुख शाह यांच्या विशेष प्रयत्नाने मंजूर करण्यात आला असून या कामाचा शुभारंभ आ.फारुख शाह यांचे हस्ते करण्यात आला.सुलतानिया चौक येथे संपन्न झालेल्या शुभारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.वसिम मेमन, होते यावेळीआ.फारुख शाह यांचे सोबत ,नगरसेवक आमिर पठाण,शोएब मुल्ला,प्यारेलाल पिंजारी,इकबाल शाह,डॉ. शराफत अली,आसिफ पोपट शाह,हलीम शमसुद्दिन, मुद्दसर शेख,माजीद पठाण,इरफान शेख,अजहर सैय्यद,अक्तर शेख, हारुण धोबी,यासीन मेमन,अनिस शेख, नईम काझी, नविद शेख,राजा पठाण,सलमान मणियार,नईम मणियार,अल्ताफ शेख,मोहसीन शेख, यांनी केले तर सूत्रसंचालन शोएब मुल्ला यांनी केले.







## हालचालींना वेग

आधुनिक केसरी

संघ परिवार व भारतीय जनता पक्षाच्या दृष्टीने संवेदनशील विषय असलेल्या समान नागरी कायद्याबद्दल केंद्रीय विधी व न्याय आयोगाने बुधवारपासून सल्लामसलतीची प्रक्रिया सुरू केली आहे. याबाबत सार्वजनिक आणि धार्मिक क्षेत्रातील संघटनांकडून मते मागवण्यात आली असून, येत्या महिनाभरात त्या आयोगाकडे नोंदवायच्या आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते इंद्रेशकुमार यांनी काही दिवसांपूर्वीच संघटनेच्या कार्यक्रम पत्रिकेवरील समान नागरी कायद्याचा मुद्दा छेडला होता. 'समान नागरी कायदा हे सुरक्षा कवच आहे', असे मत त्यांनी मांडल्यानंतर या विषयाची चर्चा पुन्हा सुरू झाली होती. त्यातच आता विधी व न्याय आयोगाने या कायद्याबद्दलची प्राथमिक प्रक्रिया सुरू केली आहे. आयोगाने बुधवारी निवेदन प्रसिद्धीस देऊन याबाबतची माहिती दिली. भारताच्या २२व्या कायदा आयोगाने समान नागरी कायद्याबद्दल मान्यताप्राप्त सामाजिक व धार्मिक संघटनांची मते पुन्हा जाणून घेण्याचा निर्णय घेतला आहे. इच्छुकांनी आपली मते येत्या ३० दिवसांमध्ये टपालाद्वारे किंवा किंवा membersecretary-lci@gov.in या ईमेल आयडीवर आयोगाकडे पाठवावीत, असे या निवेदनात म्हटले आहे. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम ३७० हटविणे, अयोध्येत भव्य राममंदिर उभारणे व समान नागरी कायदा लागू करणे हे नेहमीच भारतीय जनता पक्षाचे निवडणुकीतील तीन प्रमुख मुद्दे राहिले आहेत. सन २०१४ आणि २०१९च्या दोन्ही लोकसभा निवडणुकांमध्ये भाजपच्या जाहीरनाम्यांतील प्रमुख निवडणूक आश्वासनांमध्ये समान नागरी कायदा हेसुद्धा एक होते. उत्तराखंड आणि गुजरातसारख्या भाजपशासित राज्यांनी तर समान नागरी कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या दिशेनेही ठोस पावले उचलली आहेत. यापूर्वी २१व्या न्याय आयोगानेही या विषयाचा अभ्यास केला होता. आता पुन्हा नव्याने प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. समान नागरी कायदा लागू करण्याबाबत अद्याप निर्णय घेण्यात आलेला नसल्याचे केंद्रातील मोदी सरकारने यापूर्वी राज्यसभेत सांगितले होते. मात्र २२वा न्याय आयोग या कायद्याशी संबंधित विषयावर विचार करू शकतो. २१व्या आयोगाचा कार्यकाळ ३१ ऑगस्ट, २०१८ रोजी संपला. त्या आयोगानेही या प्रकरणावर दोन वेळा सर्व भागधारकांचे मत जाणून घेतले होते. ती प्रक्रिया आता पुन्हा सुरू करण्यात आली आहे.



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

## हिंद प्रशांत सागर क्षेत्रातील शांतता, स्थैर्य व विकासाचा संदेश

आधुनिक केसरी

**हिंद प्रशांत सागर क्षेत्रातील शांतता, स्थैर्य व विकासाचा संदेश हिंद प्रशांत सागर क्षेत्र हे जगाच्या शांतता व कल्याणासाठी तसेच आशियाच्या सत्ता समतोलासाठी अत्यंत महत्वाचे क्षेत्र आहे. भू-राजनैतिक दृष्टीने या क्षेत्रातील शांततेलला विशेष महत्व आहे, हे लक्षात घेऊन जपानमधील हिरोशिमातील 'द ग्रँड प्रिन्स' हॉटेलमध्ये जी-७ शिखर परिषद झाली. या परिषदेचे यजमान पद जपानकडे होते. शिखर परिषदेतील समग्र विचार मंथन हे अण्वस्त्र मुक्त जगापासून ते मानवी कल्याणापर्यंत अनेक महत्वाच्या विषयावर ठराव करण्यात आले. तसेच या परिषदेला जोडून क्वाड शिखर परिषदही घेण्यात आली.**

तिथे चीनच्या आर्थिक व लष्करी दडपशाहीचा निकराने सामना करण्यासाठी, जगातील लोकशाही प्रधान राष्ट्रांनी दृढ संकल्प केला, तसेच दहशतवादाच्या उच्चाटनासाठी सामुदायिक प्रयत्नावर भर देण्यात आला.

**क्वाड परिषदेतील मंथन :**

जगातील चार प्रमुख लोकशाही राष्ट्रांची प्रमुख परिषद होय. ऑस्ट्रोलियाचे पंतप्रधान अँथोनी आलबान शेख, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, जपानचे पंतप्रधान किसीदा किमीयो तसेच अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडन हे हिरोशिमा येथे झालेल्या क्वाड परिषदेत हजर होते. परिषदेत नरेंद्र मोदी यांनी हिंद प्रशांत क्षेत्रातील शांतता, विकास व स्थैर्यासाठी सामुदायिक संकल्प केला. मुक्त स्थिर आणि समृद्ध हिंद प्रशांत क्षेत्र हा मानवी कल्याणाचा प्रधान मार्ग होय. असा दृष्टिकोन ठेवून सामाजिक, आर्थिक परिवर्तन आणि लोकशाही तत्वावर आधारित सहकार व विकासाचा मार्ग हा सर्वांना अर्थिक भरभराटीकडे घेऊन जाऊ शकतो. हिंद प्रशांत क्षेत्रातील स्थैर्यासाठी आणि विविध आव्हानांना सामोरे जाण्यासाठी क्वाड हे एक सकारात्मक आणि व्यावहारिक व्यासपीठ आहे. या क्षेत्राच्या विकासासाठी नवा अजेंडा म्हणजे विकासाचा कार्यक्रम पुढे नेण्याचे त्यांनी आव्हान केले. क्वाड नेत्यांच्या निवेदनामध्ये दोन प्रमुख पैलू प्रकट होतात. आपल्या 'व्हिजन स्टेटमेंन्ट'मध्ये त्यांनी म्हटले की, या प्रदेशाच्या भविष्यासाठी स्वच्छ व सुस्पष्ट धोरण निश्चित केले आहे आणि या धोरणाच्या पुर्ततेसाठी सर्वांनी मिळून सामुदायिक प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचे सुनिश्चित केले आहे. हिंद प्रशांत क्षेत्राला स्वच्छ उर्जा आणि अल्पदरात उर्जा पुरवठा करणे आणि पुरवठा साखळीतील कच्चे दुवे भरूने काढणे हे या परिषदेचे ध्येय होते. विकसनशिल राष्ट्रांना परवडेल असे तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यावरही परिषदेत एकमत दिसले. तसेच फायबर क्षेत्रात उपयुक्त भागीदारी विकसित करणे, सुरक्षित सॉफ्ट वेअर तंत्रज्ञान पुरविणे हे ही या परिषदेतील महत्त्वाचे मुद्दे. तसेच आणखी एक पैलू म्हणजे या क्षेत्रातील देशांचे परस्पर पुरक संरक्षण करणे, जमीन, पाणी आणि उर्जा तसेच सागरी संपर्क यांना चालना देणे, लोक संपर्क, संस्कृती संवर्धन यावर भर देणे क्वाड संघटनेचा प्रामाणिक उद्देश आहे. या संघटनेचे भावी यश प्रामाणिक प्रयंत्नावर अवलंबून असणार आहे.

**जी-७ परिषदेचा संदेश :** हिरोशिमा येथे झालेली जी-७ शिखर परिषद अनेक अर्थाने गाजली. या परिषदेच्या यशाबद्दल अमेरिकने व्हाईट हाऊसच्या केलेले निवेदन महत्वाचे आहे. या परिषदेने युक्रेन प्रश्नांवर एकमताने निर्णय घेतला. युक्रेमचे अध्यक्ष झेलनस्की हे या परिषदेत उपस्थित होते. जगातील आर्थिक सुरक्षेसाठी जी-७ राष्ट्रांनी सामुदायिक प्रयत्न करावा असे ठरले. जागतिक हवामान बदलाचा धोका लक्षात घेऊन स्वच्छ उर्जा स्त्रोताचा विकास करावा, पर्यावरण पूरक आर्थिक विकासाची साधने विकसित करावित यावर भर देण्यात आला. तसेच घात अपघाताने एखादा अणु स्फोट झाला तर सर्व मानव समाज नष्ट होई हा धोका लक्षात घेऊन निःशस्त्रीकरणावर भर देण्यात आला, आणि अर्ध्या जगातील गरीबी दैन्य व दारिद्र दूर करण्यासाठी समान वैश्विक आव्हानांना परस्पर सहकार्याने सामोरे जाण्याचे ठरले. प्रत्येक देशाने जबाबदारीने व दुसऱ्याला विश्वासात घेऊन सकारात्मक वर्तन केले तर हवामान बदलाचे संकट व त्यातून उद्भलेल्या बिकट प्रश्नांवर मात होईल. जी-७ परिषदेतील विचार मंथन हे मानवी कल्याण्यासाठी वरदान ठरणार आहे. आशिया प्रशांत क्षेत्रातील साधन सामुग्री व व्यापारावर डोळा ठेवून चीन करत असलेल्या प्रयत्नांचा निषेध करण्यात आला आणि पथदर्शक रचनात्मक



विकासाचा मार्ग ठरविण्यात आला. त्यांच्या या संघटनेच्या निवेदनातील रचनात्मक, मानवतावादी, आर्थिक , सुरक्षा विषयक उपाय योजना महत्वाच्या आहेत. युक्रेनमधील युद्ध प्रसंग सामोपचाराने टाळावा आणि जगाच्या इतर भागावरील नकारात्मक परिणाम टाळण्याठी सर्व राष्ट्रांनी सामोपचाराने प्रश्न सोडवावेत. या दृष्टीने विविध उपयायोजनांची चर्चा करण्यात आली आणि रशियाला समज देण्यात आली. तसेच आर्थिक कल्याण व सुरक्षा यांचा विचार करण्यात आला.

**हिंद प्रशांत क्षेत्रातील शांतता व विकास :**

हिंद प्रशांत क्षेत्रातील शांतता बिघडविण्याचा प्रयत्न चीन सारखी काही राष्ट्रे करत आहेत. हिंद प्रशांत क्षेत्रामध्ये जगातील ४० % लोकसंख्या रहाते व त्याचा जीडीपी ही वाखाणण्यासारखा आहे परंतु कोविडनंतर आणि युक्रेन युद्धामुळे जगावर मंदीचे संकट आले. जगातल्या अनेक भागात सततच्या युद्ध व तणावामुळे अन्न सुरक्षा साखळी बिघडली. उर्जा संकट उभे राहिले, त्याचा फटका हिंद प्रशांत क्षेत्रालाही बसत आहे. हिंद प्रशांत क्षेत्रातील विकासाचे अनेक प्रश्न समान असून, तांत्रिक, आर्थिक आदानप्रदानाने प्रश्न सुटू शकतील यावर प्रकाश टाकला. आस्ट्रोलिया आणि भारत यामधील समान लोकपरंपरा तसेच सामाजिक आर्थिक विकासाचे प्रश्न सोडविण्यासाठी परस्परांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, पर्यटन इत्यादी क्षेत्रातील अदान प्रदानाचे महत्व त्यांनी प्रतिपादन केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या दूसऱ्या कार्यकाळात क्वाड परिषद तसेच जी-7 आणि न्यूगिनी बेटावरी हिंद प्रशांत शिखर परिषद या तीन परिषदामुळे त्यांच्या कारकिर्दीत त्यांना इतिहासाने हा तिहेरी मुकुट प्रधान केला आहे. त्यांनी युक्रेन चे अध्यक्ष झेलनस्की यांच्याशी मैत्रीपूर्ण वातावरणात हृदयाचा संवाद सादला. युद्धामुळे प्रश्न सुटत नाहीत ते उलट अधिक बिकट होतात हे त्यांनी युक्रेनच्या अध्यक्षांना समाजवून सांगितले. एक वर्षानंतरही सतत चालू असलेला रशिया युक्रेन मधील तणाव आता मिटला पाहिजे, त्यातच उभ्या मानव जातीचे हीत आहे. भारत एक विश्व, एक परिवार, एक संस्कृति हे ध्येयवाक्य समोर ठेवून कार्य करत आहे. मानवता आणि विश्वबंधुत्व आणि शांतता यातच सर्वांचे भले आहे, हे त्यांनी या सर्व परिषदातून प्रभावी पणे मांडले आहे. हिरोशिमा, न्यूगिनी आणि आस्ट्रोलियात कमीत कमी शब्दात प्रभावी संदेश देणारी भाषणे त्यांनी केली आहेत. हिंद प्रशात क्षेत्रातील शांतता आणि स्थैर्य व सुरक्षा हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश होता. शांतता आणि विकास याचा ध्यास घेऊन कार्य करणे हा अर्ध्या जगातील लोकशाही मानणाऱ्या प्रजेच्या सर्वांगिण कल्याणाचा संदेश आहे. तोच भावी विकासाचा कथदर्शक मार्ग आहे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विश्व गुरू या नात्यांनी भारताचे नवे सामर्थ्य प्रकट केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हिंद प्रशांत क्षेत्रातील जनतेच्या विकासाची हमी दिली आहे आणि चिनच्या दडपशाहीला विरोध करून आशियाच्या कल्याणाचा मार्ग सुलभ केला आहे. त्यामुळे हिंद प्रशांत क्षेत्रात स्थैर्याचे नवयुग अवतरेल यात शंका नाही.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

## पर्जन्य जलसंधारण प्रत्येकाचे कर्तव्य!

आधुनिक केसरी

**भारतीय हवामान खात्याने यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस होईल असा अंदाज वर्तवला आहे. यावर्षी पाऊस उशिरा येईल असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता तो खरा ठरताना दिसत आहे. ७ जूनला महाराष्ट्रात दाखल होणारा मान्सून १५ जून ओलांडला तरी दाखल झाला नाही. पाऊस लांबल्याने बळीराजा चिंतातुर झाला आहे. पाऊस लांबला की पेरण्या लांबतात आणि पेरण्या लांबल्या की बळीराजाचे पुढील सर्व नियोजन कोलमडते. राज्यात अद्याप पाऊस न सुरू झाल्याने राज्यातील अनेक भागात भीषण पाणीटंचाई जाणवू लागली आहे. धरणातील पाणी साठा संपत आला आहे जर पाऊस असाच लांबला आणि सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला तर पुढील वर्षी आपल्याला पुन्हा दुष्काळाला सामोरे जावे लागेल.**

गेल्या काही वर्षात राज्यात अपुरा पाऊस पडल्यामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यात पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली होती. हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागत होती. पाण्यासाठी दाही दिशा.... अशी लोकांची अवस्था झाली होती. आता यावर्षी पुन्हा एकदा हवामान खात्याने तशीच शक्यता वर्तवली असल्याने पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन आणि वापर करावा लागणार आहे. यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडणार असल्याने पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यावी लागणार आहे. पावसाच्या जास्तीतजास्त पाण्याची बचत कशी होईल याचे नियोजन आतापासूनच करावे लागणार आहे. जमिनीवर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन नसल्यामुळे बरेचसे पाणी वाया जाते. कमी पाऊस पडणाऱ्या भागात तर हा पाण्याचा अपव्यय होय. महाराष्ट्रात पडणाऱ्या पावसाचा विचार करता आपल्याकडे पाणी जिरवणे आणि पाणी साठवणे या दोन तंत्राची खूप जरुरी आहे. पाणी साठवण्यापेक्षा पाणी जिरवण्याचा फायदा असा की भूगर्भातील पाण्याचे बाष्पीभवन होत नाही व त्यात घट होत नाही. जलव्यवस्थापन याचा अर्थ धरणे बांधून, पाईपलाईन शहरापर्यंत नेऊन घरोघरी पाणी पोहचवणे असा नाही. जलव्यवस्थापन याचा अर्थ समाज व पाणी यांच्यातील संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणे. त्यासाठी पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्व पटवून देणे. पावसाचे पाणी वाया जाऊ नये यासाठी पाण्याचे व्यवस्थापन कसे करावे याचे शाळा, कॉलेजमधील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करायला हवे. यासंदर्भात नागरिकांचेही प्रबोधन व्हायला हवे. नदी, विहीर, तलाव, बंधारे यात पावसाचे जास्तीतजास्त पाणी कसे साठेल याचे नियोजन सरकारी पातळीवर व्हायला हवे. नागरिकांनी आपल्या घरात, सोसायटीत रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम बसवावी. शाळा, कॉलेज तसेच सरकारी कार्यालयातही रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम बसवावी. पावसाच्या पाण्याची साठवणूक म्हणजे पर्जन्य जलसंधारण प्रत्येक घरात, सोसायटीत, कार्यालयात झाले पाहिजे. कुठल्याही परिस्थितीत पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. पाण्याचा थेंब न थेंब महत्वाचा आहे. कारण पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे कारण ती काळाची गरज आहे. दुष्काळापासून वाचायचे असेल तर पर्जन्य जलसंधारण करावेच लागेल.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# बंद गोदाम चालू करा, अन्यथा मनसे स्टाईलने चालू करू : दत्तात्रय पा. कावडे

## सर्वसामान्य नागरीकांचे होत आहेत बेहाल

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्याच्या स्वस्त धान्य दुकानदारांना शिधा पुरवठा करणारे प्रशासकीय गोदाम मागील पंधरा दिवसापासून बंद असल्यामुळे स्वस्त धान्य दुकानदार पुरवठाधारक व गोरगरीब जनता हैराण असून हे गोदाम तात्काळ चालू करा, अन्यथा मनसे स्टाईल आंदोलन करू असा इशारा मनसे तालुका प्रमुख दत्तात्रय पा. कावडे यांनी दिला आहे. धर्माबाद तालुक्याचे नूतन तहसीलदार एस. के. हांदेश्वर यांनी पदभार स्वीकारल्यानंतर येथील प्रशासकीय यंत्रणा सुरळीत होईल अशी अपेक्षा होती. मात्र येथील प्रशासकीय गोदाम कार्यालय मागील पंधरा दिवसापासून बंद असून यामध्ये सर्वसामान्य नागरीकांचे बेहाल होत आहे. तसेच स्वस्त धान्य दुकादार वारंवार गोदामाचे चकरा मारून व प्रशासकीय अधिकाऱ्यांना वारंवार सांगून कुठलीच व कसल्याच प्रकारची दखल घेतल्या जात नाही. त्याचे परिणाम सर्वसामान्य गोरगरीब कुटुंबावर होत आहेत. याशिवाय ग्रामीण भागातील नऊ स्वस्त धान्य दुकानदारापर्यंत मे महिन्याचे राशनही अद्याप पोहोचलेला नसल्याचीमाहिती मिळाली आहे. स्वस्त धान्य दुकानातून मिळणाऱ्या राशनवर बऱ्याच लोकांचा उदरनिर्वाह अवलंबून असतो. मात्र स्वस्त धान्यच मिळाले नसल्यामुळे गावातील गोरगरीब कुटुंबावर उपासमारीची वेळ आलेली आहे. प्रशासकीय गोदाम पंधरा दिवसापासून का बंद आहे ? याला जबाबदार कोण आहे ? याची तात्काळ चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यावर कार्यवाही करावी अन्यथा मनसे इस्टाईल आंदोलन करू असा इशारा मनसे तालुका प्रमुख दत्तात्रय पाटील कावडे यांनी निवेदनाच्या माध्यमातून तहसीलदारांना दिला आहे. या निवेदनावर शहर सचिव सुनील सूर्यवंशी ,रंजित सिंह ठाकूर यांच्या स्वाक्षरी आहेत.



मागील पंधरा दिवसापासून धर्माबादचे प्रशासकीय गोदाम बंद असल्याने हातावर पोट असलेल्या लोकांना उपासमार सहन कराव लागत आहे . हे मनसे सहन करणार नाही . तात्काळ गोदाम चालू करून धान्य वितरित करा अन्यथा आम्ही चालू करू .- **दत्तात्रय पा . कावडे, मनसे तालुका प्रमुख**

# घनश्याम दराडे यांच्या कारला अपघात

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** आपल्या भाषणाने संपूर्ण महाराष्ट्राला खळखळून हसवणारे आणि विशेष म्हणजे महाराष्ट्रात 'छोटा पुढारी' अशी ओळख असलेल्या घनश्याम दराडे यांच्या कारचा भीषण अपघात झाला आहे. हा अपघात आज बुधवारी सकाळी नऊ वाजेच्या सुमारास पुणे - सोलापूर महामार्गावर सोरतापवाडी ( ता. हवेली ) येथील ग्रामपंचायतीच्या हद्दीत झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. घनश्याम दराडे यांच्या अपघातग्रस्त कारमध्ये त्यांचे आई, वडील अजून दोघेजण असल्याची माहिती मिळाली आहे. सुदैवावे या अपघातात कुठलीही जीवितहानी झालेली नाहीय. मात्र, दराडे यांच्या मातोश्री किरकोळ जखमी झाल्या असून गाडीचे मोठे नुकसान झाले आहे. अपघातस्थळावरुन मिळालेल्या माहितीनुसार, घनश्याम दराडे यांचे आई-वडील आणि अजून दोघेजण आज बुधवारी सकाळी पुणे - सोलापूर महामार्गावरून उरुळी कांचनहून पुण्याच्या दिशेने निघाले होते. याचवेळी सोरतापवाडी ग्रामपंचायत हद्दीतील फाट्यावर अचानक एक वाळूच्या डम्परने दराडे यांच्या चारचाकीला चालकाच्या उचव्या बाजूने धडक दिली. या अपघाताने घनश्याम दराडे खूप घाबरले होते. मात्र, कुठलीही हानी झाली नसल्याचे आणि सर्वजण सुखरूप असल्याचे त्यांच्या लक्षात येताच ते थोडे स्थिरावले असल्याचं प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या मार्गावरून पालखी जाणार असल्याने जड वाहनांसाठी महामार्ग बंद करण्यात आला होता. मात्र, तरीही हा डम्पर महामार्गावर कसा आला ? आणि अपघात झाला कसा ? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. या अपघातात कारचे नुकसान झाले असून अपघातस्थळी मोठी गर्दी जमा झाली होती. अपघाताची माहिती मिळताच, दराडे स्वतः घटनास्थळी पोहचले होते. लोणी काळभोर पोलीस घटनास्थळी पोहचले असून, अधिक माहिती घेण्याचे काम सुरु आहे.

# बळीराजाचे विठूरायाला साकडे

## येरे घना, येरे घना म्हणतच प्रतीक्षा पावसाच्या थेंबाची

आधुनिक केसरी न्यूज

**सदानंद माळी**

**कडेगाव :** मृग नक्षत्र हेच पावसाळ्यातील पहिले नक्षत्र ओळखले जाते या नक्षत्रापासून पाऊसाला सुरु होतो मृग नक्षत्र दि. 8 पासून सुरु झाले असून हतीवर आरुढ होत या नक्षत्राचे आगमन झाले आहे हत्तीसारसा जोरदार पाऊस पडावा अशी बळीराजाची अपेक्षा असताना नक्षत्राने मात्र बळीराजाला चांगली हुल देत हावालदिल केले. जोपर्यंत दमदार पाऊस होत नाही तोपर्यंत बळीराजा खरीप हंगामात पेरणी करणार नाही असे चित्र सध्या सर्वत्र दिसत आहे. आम्ही शेतकरी झालो, वाटे जन्म गेला वाया, तरी पिकवतो आशा, आहे पावसाची छाया असे म्हणतच बळीराजा पावसाची छाया मागत आहेत पण ताप उन्हाच्या भटटीचा, करी ढेकाळाच्या लाहया, ये पावसा लवकर, पड वावरात माझ्या अशी आर्त हाक वरुणराजाला बळीराजा मारत आहे अरे वरुणराजा तू वेशीपर्यत आलाय आता नव्या नवरीसारखा लाजू नकोस वरुणराजा राजा सारखा वाजत गाजत हतीच्या पावलानी बरस एरवी आभाळातून बरसणारा वरुणराजा तू बळीराजाच्या डोळ्यातून अश्रू बरसण्याची का वाट पहातोस हे वरुणराजा आता दुष्काळ नको रे बाबा,विठ्ठला भिजव आता रान,अन दुष्काळ सरता सरेना हे विठ्ठला यंदा देवा चांगला पाऊस पडू दे, शेतशिवार चिंब भिजू दे, हे विठ्ठला यंदा तरी समाधानकारक पाऊस बरसू दे म्हणणारा बळीराजा मात्र चातक पक्षाप्रमाणे वरुणराजाची प्रतिक्षा करत आहे मृग नक्षत्र यंदा तरी कोरडे जाणार असे चिन्ह दिसत आहे मृग नक्षत्रात ही वरुणराजाने दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या मध्ये चिंतेचे वातावरण आहे



सर्वत्र तापमानाने उच्चांकी पारा गाठला असल्याने जून महिना संपला तरी हवेतील उष्णता कमी होण्याची चिन्ह दिसत नाही पाझर तलाव आटले विहिरींनी तळ गाठला असल्याने उसाची आडचाली लागणी हया पाण्याअभावी अडचणीच्या ठरल्या आहेत तर लागणी लांबणीवर पडत आहेत सध्या उभा ऊस पाण्याअभावी वाळत असल्याचे चित्र दिसत आहे. वरूणराजाने दडी मारल्याने व तीव्र तापमानामुळे पाणीटंचाई निर्माण झाल्याने शेतकऱ्यावर दुहेरीत संकटात सापडला आहे शेतकरी शेतात राब राब राबवत असतो रात्रंदिवस काबाडकष्ट करून घामाचे मोती करतो तेव्हा कुठे धान्य हाती येते त्यातच निसर्गाची लहरी अवस्था असल्याने शेतीच्या उत्पादनात पाहिजे तसे उत्पन्न मिळत नाही सालभर मेहनत काबाडकष्ट करून कुटुंबियांना घास भरवणेही मुश्किल बनत चालले आहे आलेल्या संकटाशी मुकाबला करतच बळीराजा मोठ्या हिमतीने नव्या हंगामात पीक येईल या आशेने मृगच नक्षत्राकडे पहात आहे कोरडे आभाळ ,थोडे फार ढग, गार वारा येत असला तरी निसर्गराजा व वरूण राजा कृपा कर म्हणतच यंदा मृगाच आभाळ भरु दे... च्या नावाचा तुझ्या येळकोट करीन असं आभाळाकडे पहात वरुणराजाला बळीराजा साकडे घालताना म्हणतो की नको पांडुरंगा मला, सोन्या चांदीचे दान रे, फक्त भिजव पांडुरगा, हे तहानलेले रान, कमरेवरचे हात सोडुनी, आभाळाला लाव तू, ढगाला थोडे हलवून, भिजव माझा गांव तू अशी बळीराजाने विठ्ठलाला विनवणी करतच पावसाच्या मागे मृगजळाप्रमाणे धावत आहे हे विठ्ठला माझ्या घामाचे व्हावे मोती खरे, शेतात पाझरु दे अमृताचे झरे यासाठी या बळीराजाची आर्त हाक वरुणराजा पर्यत विठ्ठलाने पोहचवून वरुणराजा बरसणार का ?



अर्जंट फ्लॅट विकणे आहे

नक्षत्रवाडी येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ,

संपर्क : मो. 7588818406

महाराष्ट्र Business Katta












# पत्रकारांचा नेता वसंत मुंडे



सुभाष धस
संचालक,
(Janprabodhan
यू ट्यूब चॅनेल)

आधुनिक केसरी

**फेसबुक पोस्ट पाहत असताना आमचे मित्र लोकसत्ताचे वार्ताहर आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष वसंतराव मुंडे यांनी पोस्ट केलेली मी पाहत होतो.ती पोस्ट त्यांनी चक्क दुबई येथून केली होती आणि जगभरामध्ये सर्वात उंच इमारत जी आहे बुर्ज खलिफा.. त्याच्यासमोर त्यांचा घेतलेला फोटो त्यांनी पोस्ट केला होता. दुबईला वसंतराव गेले कशासाठी हे ज्यावेळी मी जिज्ञासांनी पाहिले त्यावेळी माझ्या लक्षात आलं की वसंत मुंडे यांना दैनिक लोकमत समूहाचा, आंतरराष्ट्रीय दर्जाचा, अतिशय प्रतिष्ठेचा समजला जाणारा नॅशनल एक्सलन्स इन सोशल जर्नालिझम हा पुरस्कार देण्यात आला होता..त्यांच्या अवतीभवती वावरणाऱ्या माझ्यासारख्या माणसासाठी निश्चितच तो सुखद धक्का होता कारण तो विषय त्यांच्याकडून माझ्या कानावर आलेला नव्हता .म्हणून तो धक्का सुखद होता .**

हा सुखद धक्का बसलेला असतानाच वसंत मुंडे यांची वीस वर्षाची पत्रकारितेची कारकीर्द माझ्या डोळ्यासमोर चमकली आणि मग जनप्रबोधनच्या माध्यमातून त्यांची ही कारकीर्द या निमित्ताने सगळ्या जनतेच्या समोर आणावे असं माझ्या मनात आलं म्हणून आजचा हा लेख आहे.. वसंत मुंडे हे परळी तालुक्यामध्ये लाड जरी नावाचं छोटसं गाव आहे, तिथेच त्यांचे शिक्षण झालं आणि आंबेजोगाई मध्ये उर्वरित शिक्षण झालं .1999 च्या दरम्यान ते बीडमध्ये पत्रकारितेसाठी आले त्यावेळी ते लोकपत्र या दैनिकासाठी काम करत होते .काम करत असताना त्यांनी जनतेच्या प्रश्नांशी कमिटमेंट दाखवणारी पत्रकारिता केली आणि याचं एक उत्कृष्ट उदाहरण म्हणजे ऊस तोडणी कामगारांचे प्रश्न समजावून घेण्यासाठी स्वतः ऊस तोडणी कामगारांच्या फडामध्ये दहा दिवस त्यांनी मुक्काम ठोकला आणि एक लेखमाला दर्जेदार तयार झाली. ती वर्तमानपत्राच्या माध्यमातून त्यांनी प्रसिद्ध केली. त्यांचे हे काम पाहून मुंबई येथील समर्थन नावाची सामाजिक संस्था, तिने वसंत मुंडे यांना स्कॉलरशिप दिली. या सगळ्या घडामोडीमध्ये 2002 च्या दरम्यान दैनिक लोकसत्ता मध्ये वसंत मुंडे यांचा प्रवेश झाला. वसंत मुंडे 2002 पासून आजतागायत दैनिक लोकसत्ताचच काम करत आहेत आणि त्यांनी जिल्ह्यामध्ये लोकसत्ता सर्क्युलेशन वाढवत असताना वेगवेगळ्या पद्धतीने किती मेहनत केलेली आहे याचा मी प्रत्यक्ष साक्षीदार आहे.म्हणून त्यांची पत्रकारिते मधली जी निष्ठा आहे, त्याचं जे सातत्य आहे ,त्याचं फळ त्यांना वेळोवेळी मिळालेलेच आहे आणि हेही फळ जे आहे ते त्याचंच आहे असं मला वाटतं .याच्या अगोदरही अनेक पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत .एकदा 2006 च्या दरम्यान मला वाटतं तत्कालीन प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांनी देशांमधल्या फक्त दहा पत्रकारांची निवड केली होती .एक कायदा त्यांना करायचा होता. त्या कायद्यासंबंधी पत्रकारांनी आपलं मत मांडावं आणि त्याच्यानंतर तो कायदा तयार होणार होता. त्याच्यासाठी संपूर्ण भारत देशांमधून जे दहा पत्रकार निवडले त्याच्यामध्ये वसंत मुंडे एक होते. म्हणजे पत्रकारितेच्या क्षेत्रामध्ये ही जी त्यांची उंची आहे ही उंची त्यांनी सतत कशी कायम ठेवलेली आहे हे या निमित्ताने मला सांगायचं आहे. खरं म्हणजे मुंडे हे नाव आणि नेतृत्व हा विषय तसा समानार्थी शब्द. गोपीनाथ मुंडे असतील पंकजा मुंडे, धनंजय मुंडे ते प्रशासनाच्या क्षेत्रामध्ये तुकाराम मुंढे असतील आणि आता पत्रकारितेच्या क्षेत्रामध्ये हे वसंत मुंडे .. त्यांचा जो नेतृत्वाचा पैलू आहे तो विषय या ठिकाणी मला महत्त्वाचा वाटतो ..पत्रकार केवळ नसणं तर पत्रकारांचा नेता असणे हे त्यांचे विशेष आहे.. विशेषतः ज्यावेळी कोरोना काळामध्ये पत्रकारांना अडचणी आल्या गरिबांसारखं त्यांना कुठे काही मदती मागता येत नव्हत्या आणि त्यावेळी पत्रकार अतिशय हालाखीच्या परिस्थितीमध्ये असताना त्यांनी डोनर गाठले आणि त्या डोनरच्या माध्यमातून पत्रकारांना व्यक्तिगत मदती करण्याचं काम केलं.. सर्वसामान्य माणसांनाही मदत केली .त्यानंतर सरकारलाही मदत केली तर स्वतःच्या संघटनेच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक ॲम्बुलन्स त्यांनी दिली. त्या ॲम्बुलन्स मुळे कितीतरी रुग्णांचे प्राण वाचले आणि म्हणून कोरोनाच्या काळामध्ये त्यांनी जे काम केलेलं आहे त्याच्यामधून त्यांची नेतृत्व क्षमता निश्चितच सिद्ध झालेली आहे. दुसरं ते अधीस्वीकृती समितीचे अध्यक्ष आहेत . 2015 ला त्यांची नियुक्ती केली. त्याच्या अगोदर वार्ताहर स्वीकृत होणं म्हणजे त्याला पत्रकारितेचा दर्जा मिळणे खूप अवघड होतं. अध्यक्ष झाल्यानंतर वसंतरावने ती प्रक्रिया थोडी सोपी केली आणि समितीचा अध्यक्ष या नात्याने ते चक्क तालुका स्तरावर गेले. त्या त्या तालुक्यामध्ये प्रत्यक्ष पत्रकारांना बोलून फायदे त्यांना कायदेशीर मदत देण्याचं काम वसंत मुंडे यांनी केलेल आहे हे उल्लेखनीय. त्याच्यानंतर वर्तमानपत्राच्या केवळ पत्रकारांनाच नाही तर संपूर्ण वर्तमान क्षेत्रामध्ये अमुलाग्र बदल घडून आणण्याचे काम देखील वसंतराव यांनी केलं. हे खरं म्हणजे त्यांच्या पत्रकारितेच्या क्षेत्रा मधील आणि संघटनेच्या पदावर असतानाच सर्वात मोठ यश आहे. भारत देशामध्ये असा समज आहे की वर्तमानपत्र ही फुकट घेण्याची बाब आहे ज्ञा न हे फुकट घेतलं पाहिजे दिलं पाहिजे. अशा पद्धतीची मान्यता असल्यामुळे वर्तमानपत्र नॉमिनल चार्जेस मध्ये विकली जातात. आणि त्यामुळेच वर्तमानपत्राचा व्यवसाय डबघाईला आलेला आहे. उत्पादन किंमत समजा दहा रुपये वर्तमानपत्राची असेल तर त्याची विक्री किंमत फक्त तीन रुपये.. आणि उरलेला सात रुपयाचा तोटा.. हा भरून काढता काढता वर्तमानपत्राचे मालक परेशान झालेले असतात. त्याच्यामधून मग पत्रकारांना मानधन देणं शक्य होत नाही आणि पूर्णवेळ पत्रकारितेचा व्यवसाय स्वीकारणाऱ्या पत्रकारांना मग अनेक दुसऱ्या गोष्टी पर्यायाने स्वीकाराव्या लागतात. नको त्या गोष्टी पुढे येतात ही गोष्ट बरोबर वसंतरावने ओळखली. आणि वर्तमानपत्राला सर्व आवाहन केलं की आपापल्या किमती वाढवा .त्यांनी प्रगतिशील देशांमध्ये वर्तमानपत्राच्या किमती आणि भारतातल्या वर्तमानपत्राच्या किमती ह्या ज्या वेळी त्यांनी मोठ मोठ्या संपादकांच्या आणि मालकांच्या नजरेला आणून दिल्या त्यावेळी त्या सगळ्या लोकांनी अतिशय सकारात्मक प्रतिसाद दिला. आणि हळूहळू महाराष्ट्रात वर्तमान पत्राचे दर वाढू लागले . त्या किमती वर्तमानपत्राच्या छापणाऱ्यांना परवडू लागलेल्या आहेत .याच्यामुळे वर्तमानपत्राच्या उद्योगाला देखील निश्चितपणे मदत झालेली आहे. नेता म्हणून वसंतराव यांचा दुसरा एक महत्त्वाचा पैलू जो मला माहित आहे ते म्हणजे पत्रकार तर आहेतच पण त्याच्याबरोबर सामाजिक कार्यकर्ते सुद्धा आहेत.. बीड जिल्ह्यामध्ये बऱ्याच सामाजिक संस्था वेगवेगळ्या ठिकाणी काम करतात. एच आय व्ही बाधित मुलांसाठी एक संस्था पालीला काम करते .आमचे मित्र दत्ता बारगजे चालवतात ..त्यानंतर आर्वी येथे शांतीवन नावाचा प्रोजेक्ट आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना शिकवण्याचा अतिशय चांगलं काम दीपक नागरगोजे करतायेत. अशा दोन-चार संस्थांच्या जिल्ह्यांमध्ये काम करतात त्यांना प्रत्यक्ष तीन कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची मदत





त्यांनी विविध दानशूर व्यक्तींच्या मार्फत केली आहे. म्हणजे सामाजिक भान असणारा पत्रकार जर त्यांनी त्याच्या क्षमता वापरल्या तर समाजाच्या किती उपयोगी पडू शकतो हे या वसंत मुंडे यांच्या माध्यमातून आपल्याला समजेल. तसं नेते स्वतःच्या वाढदिवसाच्या निमित्ताने रक्तदान वगैरे आयोजित करतात पण पत्रकाराने कधी असं केलं आहे हे माझ्या ऐकण्यात नाही. वसंत मुंडे यांचा वाढदिवस साजरा करताना पत्रकारांनी चक्क दीड हजार बॅगांपेक्षा जास्त रक्तदान केलेल आहे. वसंत मुंडेंनी वेळोवेळी पत्रकारांना आवाहन केलं, जनतेला आव्हान केलं त्याच्यामधून अनेक लोकांनी देह दान करण्याचा संकल्प केला . अनेक लोकांनी नेत्रदानाचा संकल्प. ज्या पत्रकारितेच्या पायावर वसंतराव वसंत मुंडे उभे आहेत तो विषय त्यांनी किती मन लावून केलेला आहे हे देखील समजून घेणे महत्त्वाचे ठरतं. सुरुवातीलाच मी म्हटल्याप्रमाणे ऊस तोडणी कामगारांच्या बरोबर असणारी त्यांची सहानुभूती आणि त्यांचा कनव याच्या माध्यमातून ते सतत त्यांच्या संपर्कात असतात. पूर्वी ते दहा दिवस त्यांच्याबरोबर राहिले. अजूनही संप असला की दोन-चार दिवस ते त्यांच्याबरोबर फिरत असतात. त्याचबरोबर वर्तमानपत्रांमध्ये जे लिहिले जाणारे विषय ते विषय कसे असावेत हे वसंत मुंडे कडून शिकले पाहिजे. केवळ समाजामध्ये जे घडतंय त्याच्या बातम्या देणं इतक्यापर्यंत ते मर्यादित राहिले नाहीत तर समाजामध्ये जे घडायला पाहिजे याचं शिक्षण त्यांनी आपल्या पत्रकारितेमधून दिलं. गावागावांमध्ये मुलांना शिक्षणाला शिकायला खोल्या नाहीयेत अजूनही काही ठिकाणी झाडाखाली शाळा भरतात. अशा शाळांना मदत करण्याची मानसिकता गावातल्या लोकांची असत नाही. पण धार्मिक कार्यक्रमांमध्ये मात्र ते लाखावर खर्च करतात यावर वसंत मुंडे यांनी टीका केली. काही ठिकाणी शैक्षणिक फंड पुढे येऊन गोळा करून दिला. जे शेतकरी मोठ्या प्रमाणावर स्वतःच उत्पन्न सुधारित शेतीतून घेत आहेतअसे अशा सुधारित शेतकऱ्यांना शोधलं, तिथे जाऊन त्यांच्या मुलाखती घेतल्या त्या प्रसिद्ध केल्या आणि त्याच्यामुळे हजारो शेतकऱ्यांना स्फूर्ती मिळाली आणि शेती क्षेत्रामध्ये देखील त्यांच्या पत्रकारितेमुळे चालना मिळाली हे विशेष. एक फार महत्त्वाचा कार्यक्रम ते दरवर्षी करतात आणि तो महाराष्ट्रभर चर्चिला जातो तो आमच्या सगळ्यांचे मित्र संतोष जी मानूरकर आणि ते दोघं मिळून करत असतात .पंधरा-सोळा वर्षांपासून स.मा.गर्गे यांच्या नावाने ते मान्यवरांना पुरस्कार देतात. त्यांनी महाराष्ट्राच्या दिग्गज मंडळींना तो पुरस्कार दिला त्याच्यामध्ये राजीव खांडेकर , गिरीश कुबेर, कुमार केतकर, भरतकुमार राऊत, निखिल वागळे अशा अनेक मान्यवरांना तो पुरस्कार दिला .आणि तो पुरस्काराही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख साहेब असतील गोपीनाथ मुंडे साहेब असतील शरद पवार साहेब असतील नारायण राणे असतील या सगळ्यांना या पुरस्काराच्या निमित्ताने एकत्रित करणं ..यानिमित्ताने पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करणे ..समाजाच्या विविध प्रश्नांवर जनजागृती करणं हे अतिशय मोलाचं काम वसंत मुंडेंनी केलेला आहे. आणि म्हणून मित्र म्हणून आम्ही त्यांच्याबरोबर सतत वावरत असतो परंतु त्यांचं कौतुक करण्याचा योग तसा कधी आला नव्हता ,यानिमित्ताने निश्चितपणे त्यांचं जितकं कौतुक करावं तेवढं कमीच आहे. वसंत मुंडे यांचे जे वय आहे हे वय अतिशय कमी असल्यामुळे अजून त्यांना खूप पुढे जाण्यास वाव आहे ,तर पुढच्या आयुष्यामध्ये ते निश्चितपणे अशाच पद्धतीने मोठ्या वेगाने पुढे जातील अशी अपेक्षा आपण करू ,तशा त्यांना शुभेच्छा देऊ. हा लेख व्हिडिओच्या स्वरूपात ऐकण्यासाठी janprabodhan या यूट्यूब चैनल ला सबस्क्राईब करा..

# बुद्ध तत्व: साधूत्व

आधुनिक केसरी

**वेगवेगळ्या संकल्पनेने, सज्ञेने परिभाषित केलेले तत्व, ज्याला आपण ईश्वर म्हणतो कोणी, अल्लाह, तर कोणी भगवान बुद्ध. पण बऱ्याच लोकांच्या हृदयातून एकच आवाज निघतो, तो म्हणजे "सबका मलिक एक" आणि हे सत्य पण आहे. "त्या अनाम्या नामे ठेविती, तया देव देव म्हणती" या न्यायाने वेगवेगळे नाव त्या शक्तीला दिले गेले, अर्थात ते सर्व नावे त्याला लागू पण पडतात, जी त्या शक्तीचे एक रूप असते. त्या सर्व शक्तिमान शक्तीच संबोधन आहे "ईश्वर", जो नाम रहित, रूप रहित, आकार रहित असून सर्व व्याप्त आहे, तो जाणून घेण्यासाठी प्रज्ञा, शिल, करुणा आदी गुणांचा अंगीकार करून, सदैव प्रज्ञा जागृत ठेवावी लागते. मग एकदा प्रज्ञा (ज्ञान) अर्थात सदैवच, जागृत झाली, आणि जग साक्षी भावाने बघितले, की सम्यक भाव जागृत होतो, विकसित होतो.**

हळू हळू तो साधक "बुद्ध" अवस्थेकडे प्रवास करतो, अशा बुद्धमय विभुतीचा सहवास ज्याला ज्याला मिळेल तो "बुद्धमय पवित्र जीव" त्याचा उद्धार करत जातो, त्याच्या ( सामान्य सांसारिक जीव ) समस्या सुटतात, किंवा तो त्या समस्यांकडे देखील सम्यक भावाने बघतो, अर्थात तो जाणतो की ही समस्याही जाईल, हा क्षण बदलणार, पुढे पुढे त्याची अवस्था देखील बुद्धमय होऊन जाते, यालाच "साधूत्व" म्हणतात. ज्याचे काम क्रोधादी विकार संपलेत, जो सकल भूतमात्राचे मंगल इच्छितो, तो "बुद्ध" तो साधू. जे एक अध्यात्मिक तत्व आहे, हे असे तत्व आहे की इथ "स्व" ला जाणले जाते, "स्व" ला जाणण्याचा प्रवासच अध्यात्मिक अभ्यास होय. धर्म पंथ संप्रदाय कोणताही असो, तत्व हेच असते. शक्ती स्वरूप तत्वाला कोणी सगुण रुपात बघतात तर कोणी निर्गुण रुपात, निर्गुण आणि सगुण हे त्याच्याच स्वरूपाचं एक अंग आहे, असे अनेक अनंत अंग त्या शक्तित असतात, आणि त्या शक्तीचा अंश आपण म्हणजे "जीव". या जीवाला प्राप्त झालेलं ठिकाण, निवास हेच शरीर आहे, या शरीरातील चैतन्य हाच ईश्वरी अंश होय, "सर्व भुतानाम चैतन्य", आणि हीच ईश्वरी शक्ती आहे. हेच चैतन्य शरीरातून निघून जाने म्हणजे शरीर रुपी निवास सोडणे. जो सोडावाच लागतो त्याचं नाव मृत्यू,. बुद्ध पुरुष, ज्याला संपूर्ण ज्ञान झालं. तो ते हे सर्व जाणतो त्यामुळे शरीर त्याग प्रसंगी देखील तो स्थिर राहतो. तठस्थ राहतो आणि त्याच्या हातून किंवा त्याच्या सानिध्यात जे जे घडते ते त्याच्याच मर्जीनुसार घडते, कारण त्याला ती शक्ती आलेली असते. असे अनेक बुद्ध स्वरूप विभूती सर्वत्र अवतरित होणे म्हणजे "विश्व बुद्धमय होणे" होय. ज्याचा, आपण सर्व अंश मात्र आहोत. अर्थात हे आपण न जानने हे आपले अज्ञान आहे, तर न मानने, मुढपणा किंवा मूर्खपणा.

म्हणून "सजग चित्त से, सम्यक भाव से अपने लिये, खुद को जाणणे के लिये जीवन का प्रवास, यही अध्यात्मिक अभ्यास है". यही बुद्ध मार्ग है, बाकी आपण जे जे मिळऊ त्या भौतिक वस्तू इथच ठेवणार, तर संस्कार सोबत असणार, सदैव. संस्कार हे मनावर हृदयावर सतत होत असतात, हेच संस्कार कर्माला दैंनदिन व्यवहाराला जोडले जातात. उत्तम संस्कार, उत्तम व्यवहार, उत्तम व्यवहार उत्तम संसार, उत्तम संसार तर यश कीर्ती, धन संपत्ती आदी गोष्टी त्या साधकाच्या जीवनात विपुल प्रमाणात उपलब्ध होत राहतात, किंवा ज्या प्राप्त होतील त्यात तो समाधानी राहतो. "ठेविले अनंते तैसेचि रहावे चित्त असू द्यावे समाधानी". चित्त समाधानी असेल तर मन देखील संचलित होते, मन निग्रहित होते, कारण त्याची बुद्धी स्थिर राहते, बुद्धी योग्य निर्णय घेते, "मन" बुध्दीच्या योग्य निर्णयावर ठाम राहते. मन बुद्धी चित्त हे घटक मग अहंकाराला काबूत करतात. मन बुद्धी आणि अहंकार हे तीन महत्वपूर्ण घटक "शुक्ष्म शरीराचे घटक" आहेत. अहो प्रश्न स्थूल शरीराचा नाहीच, प्रश्न आहे शुक्ष्म शरीराचा. पाणी अग्नी अकास वायू पृथ्वी हे पांच तत्व जे स्थूल शरीराशी निगडित आहेत. याच पाच तत्वाने सर्व प्राणिमात्र, वनस्पती, जलचर आदींचे शरीर बनलेले असते, इथ विज्ञान आहे. हे विज्ञान म्हणजे स्थूल शरीर समजून घेतलं तर शुक्ष्म शरीर पण समजते, सूक्ष्म शरीर समजणेच तर ज्ञान आहे. मन बुद्धी आणि अहंकार या तत्त्वांच शरीर हेच शास्वत ज्ञान आहे. अर्थात विज्ञान कळले की ज्ञान कळते. अर्थात स्तूल शरीर, सर्व भौतिक वस्तू, ज्या येतात आणि जातात, म्हणजेच या अस्थिर आहेत, क्षय होणाऱ्या आहेत म्हणून याला नश्वर म्हणतात. या सर्व सत्य मानने हेच अज्ञान आहे. हेच ज्ञान विज्ञान आणि अज्ञान या सर्व गोष्टी जीवनाच्या मूलभूत आहेत याचा अभ्यास हाच अध्यात्मिक अभ्यास होय. आणि याकडे साक्षी भावाने किंवा बुद्धमय अवस्थेने साधू अवस्थेणे बघणेच साधुत्व आहे.

डॉ. विलास इप्पर
वाणिज्य विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद



# बाप कातळातून वाहे, बाप गोड्या पाण्याचा रे झरा



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**प्रत्येक माणसाच बापाशी एक अनन्यसाधारण नातं असतं. असं म्हणतात टाचणी टोचली की तोंडातून "आई ग" आणि सूरा खुपसला की " अरे बाप रे" असा उद्गार निघतो. ह्यावरून संवेदनशीलतेमध्ये मानवी मनाने आणि मराठी साहित्यात कवी आणि लेखकांनी आईला झुकते माप दिले असते तरी बापाचे प्रेम कमी असते अशातला भाग नाही हे समजून घ्यावे लागते. भारतातील महाकाव्यांचा आढावा घेतला असता राम वनात गेले म्हणून कौसल्याला खूप दुःख झाल्याचे वर्णन येते मात्र तेथेच शोक विव्हळ होऊन मेलेला दशरथ आपण दुर्लक्ष कसा करू शकतो? किंवा मुलाचे प्राण वाचावे स्वतःच्या ममतेचा बळी देऊन कृष्णाला नंदाच्या घरी पाठवणारी देवकी आणि तिचा पुत्रविलाप लक्षात राहतो मात्र कृष्णाला घेऊन पडत्या पाण्यात पुरातून यमुना नदी पार करणारा वासुदेव कसा विसरला जाईल?**

गौतम बुद्ध जेव्हा बुद्ध होऊन राज्यात परत आले तेव्हा त्यांना परत न जाण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्टा करणारा राजा शुद्धोधन बाप म्हणून किती संवेदनशील होता याचा आपल्याला विचार करावा लागतो. बापाची महती ज्या शब्दात सांगावी त्याच शब्दात बापाचा कडवेपणा, शिस्त इत्यादी सांगण्यात मराठी साहित्य आटू लागले. त्यामुळे बाप कडकच असतो असे सातत्याने वाटत असताना अजाणत्या वयाच्या एका टप्प्यावर मातृत्वाचा वृक्ष कोसळला आणि जीवनामध्ये अंधार पसरणार अशी नातेवाईकांची कुजबुज कानावर पडत राहिली. मात्र बाप किती संवेदनशील असतो आणि त्याच्या हृदयात किती ओल असते याचा जवळून अनुभव मी आणि माझ्या भावंडांनी सातत्याने घेतला. सर्व नात्यात आणि गणगोतात बाबांचा एक नैतिक धाक होता. अतिशय सडेतोड आणि स्पष्टपणे बोलण्याची त्यांची वृत्ती होती पुढे ती आपसूकच आम्हा भावंडात उतरली. आपली मुलं जगाच्या चालीरीतीशी जुळवून घेण्याच्या योग्यतेचे व्हावे म्हणून त्यांची शिकवणी कडक होती मात्र 'प्रसंगी श्रीमंता घरच जेवण टाळलं तरी चालेल मात्र गरीबाच्या घरचा चहा टाळू नकोस' ही त्यांची महत्त्वाची शिकवण आजही जीवन जगण्यास प्रेरक ठरते. बाबांचा स्वभाव वरवर किती कडक असला तरी आतून ते फार हळवे होते याच स्पंदनाचे पुढे एका कवितेत प्रतिबिंब उमटले आणि मला म्हणावे वाटले.

**त्यांची खडकाची माया जपतो जीव सारा ओतून**
**बाप नारळ कवठ ओल सारी आतून आतून**

नारळ आणि कवठ जसे वरून कडक असतात आणि आतून ओल असते , गोडवा असतो तसेच काहीसे रूप जगातील सर्व बापाचे असते. 1988 मध्ये म्हणजे मी सहाव्या वर्गात असताना आई आम्हाला सोडून गेली आणि बाबा आम्हा सर्व भावंसाठी खूप हळवे झाले. त्यांचं हे हळवे पण आणि संवेदनशील मन आम्ही जवळून पाहिल. आपली सहचारिणी अर्ध्या मध्ये डाव सोडून निघून गेली आहे, आणि आपल्या भोवती आता लहान लहान लेकरं आहेत अशावेळी पुरुष कमालीचा हवा होतो. जगातील मातेपेक्षा हळवे कोण ? असा प्रश्न मला कोणी विचारला तर मी सांगेन " ज्यांच्या लहान लेकरांची आई मरण पावली आहे असे पुरुष मातेपेक्षाही जास्त संवेदनशील आणि हळवे असतात' म्हणूनच जगातील अशा संवेदनशील बापांबद्दल मला म्हणावे वाटते की,

**असा घनगंभीर अतिव्याकूळ कातळ म्हणजे**
**बाप माय मेल्यावर मात्र त्याला पाझर फुटतो**
**आपोआप**

खरे म्हणजे कधीही कोणाचे प्रेम दुसऱ्या कोणाच्या प्रेमासोबत तोलत नसतात मात्र कधी अशी तुलना केलीच आणि व्यक्तीच्या जीवनातील प्रेमाचे मोजमाप झाले तर नेमके कोण अव्वल येईल असा प्रश्न जेव्हा मला पडतो तेव्हा माझ्या एका कवितेत त्याचे उत्तर सापडते,

**नात्याच्या उतरंडीमधल्या प्रेमाचे होई जेंव्हा**
**मोजमाप वाटेवरचे काटे वेचून घेणारा अव्वल**
**दिसतो बाप**

वाटेवरचे सर्व काटे वेचून घेणारा बाप सर्वांत अव्वल ठरतो, मुलांच्या सुखासाठी घरदार विकून त्याचा सुख विकत घेण्याचा प्रयत्न करणारे काही बाप मी आजही पाहत आहे. मात्र जो बाप लेकरांचे पोटभरेपर्यंत दुरडीतल्या भाकरीला हात लावत नाही त्याच बापाच्या आधाराने मोठे झालेले मुलं स्वतःच्या लग्नाच्या किंवा बायकोच्या वाढदिवसाच्या दिवशी " तू नसतीस तर माझे जीवन कायमस्वरूपी अंधारात राहिले असते" अशा आशयाचे स्टेटस ठेवतात तेव्हा त्यांच्या आई-वडिलांनी यांना मोठेच केले नसते आणि आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यास हातभार लावला नसता तर फक्त आर्थिक लायकी पाहून ह्यांच्या सोबत सात पाऊले चालणाऱ्या ह्या मेणबत्त्या ह्यांच्या जीवनातील अंधार काढायला आल्या असत्या का ? असा प्रश्न नक्कीच पडतो. लग्न झालेल्या तमाम पुरुषांनी प्रामाणिकपणे स्वतःशी विचार केला तर 90% लग्न हे तुमच्या आर्थिक सरस असलेल्या परिस्थितीकडे पाहून झालेले आहेत हे प्रामाणिकपणे कबूल करावे लागेल. जगाच्या पाठीवर कोणी असं म्हणते की तुम्हाला कोणते आई वडील हवे हे तुम्हाला ठरवता येत नाही ते तुमच्या हातात नसते. मात्र पत्नी आणि मित्र यांची निवड तुम्हाला तुमच्या अधिकाराने करता येते. अशावेळी मला मुद्दा सांगावासा वाटतो की तुमच्यात असलेली लायकी पाहूनच तुम्हाला जीवन सहचर आणि मित्र निवडत असतात. आणि ही लायकी देण्याचे तुमच्या जीवनाला बहाल करण्याचे काम तुम्हाला तुमच्या चॉईस ने न मिळालेले आई-वडील करत असतात याचा कुणाला विसर पडू नये. कारण आजच्या काळात सासरच्या मंडळींनी बापाचा अपमान केला तरी बापाला दोष देत बापाला म्हातारा आणि सासऱ्याला पप्पा म्हणणारी मंडळी मी पाहत आहे. ही पिढी उद्या स्वतः सुद्धा ह्याच प्रसंगाला सामोरे जाण्याची तयारी ठेवतील का ? असा प्रश्नही पडतोच.

बाबांच्या सोबत दसऱ्याचा सोनं लुटण्याच्या सायकल वरच्या प्रवासापासून सुखवस्तू मध्यमवर्ग असा प्रवास आम्ही केला मात्र कोणत्याही क्षणी बाबांना पैशाचा अभिमान आहे असे चित्र दिसले नाही. बाबांनी आमच्या दुधासाठी म्हणून म्हशी विकत घेतल्या , बकऱ्या विकत घेतल्या, मोत्या आणि जिमी सारखी इमानदार कुत्रे सांभाळले ह्या सर्व बाबींमुळे आम्हालाही प्राण्यांचा लळा लागला. बाबांना प्राण्याप्रमाणे झाडाचा ही लळा होता. 2011 मध्ये बाबा गेले त्यांना अंतिम संस्कारासाठी नेताना जशी त्यांची तिरडी उचलली तसा दारातील बदामाचा शेंडा तुटून पडला.पुढे त्याच वर्षी श्रावण महिन्यात आमच्या जुन्या गावाकडे बाबांचे लहान पण ज्या घरात गेले त्या घराला भेट देण्याचा योग आला. खरे म्हणजे त्या घरावर आमचा हक्क नव्हता कारण ते घर आम्ही खुप आधी विकून टाकले होते. मात्र मालकाने त्या घरच्या मागील बाजूला बाबांच्या हाताने लावलेला उंबर आणि निबोणी ही दोन्ही झाडे जपली होती. तर त्या घराकडे पाहत असतांना शेजारच्या एका म्हाताऱ्याने मी कोण कुठला असे प्रश्न केले, मग "तू शिवाचा होय रे, चांगला माणूस होता तुपला बाप त्यो मेला अन इथं त्यांच्या हातचा उंबर वाळला अशी माहिती दिली". मी सुन्न झालो आणि 2011 ची ही नोंद माझ्या 2022 मध्ये एका कवितेत शब्दबद्ध झाली.

**पुढे नव्या घरासमोर बदाम तरारला**
**आणि रणरणत्या उन्हात**
**आयुष्याचा उन्हाळा करणाऱ्या दिवशी**
**त्या दिवशी वारा स्तब्ध असतांना**
**जेंव्हा तिरडीवर निघाला बाप;**
**कारण नसतांना**
**बदामाचा शेंडा मोडला आपोआप .**
**तस निमित्त असू शकत काहीही ;**
**पण सालं आपलं मन मानत नाही.**
**एवढंच...!!!**

अशी अनेक झाड बापानं लावलेली असतात मात्र पुढील पिढी त्याला ओझं समजते हे ही मी जवळून पाहत आलो आहे. शेतातील आंबा फळ देत नाही, फक्त सावली देतो म्हणून त्या झाडाला पाडणारी लोक मी पाहिलेत. अंगणात पानगडीच्या वेळी कचरा होतो म्हणून आईच्या किंवा बापाच्या हाताला लावलेले झाड मुळापासून तोडणारे लोकही आपल्याला दिसतात, म्हणूनच एकदा फार पूर्वी बाप लेकाच्या नात्याबद्दल मी एक छोटेखानी कविता लिहिली होती ती अशी,

**जेव्हा अंगणात जमा होणाऱ्या**
**पानगळीच्या कचऱ्यापासून**
**सुटका करून घेण्यासाठी**
**ते बोलावतात,**
**एखादा भाडोत्री कुऱ्हाडबाज**
**जो बेमुर्वतपणे चालवतो कुऱ्हाड,**
**आज्याने उभ्या केलेल्या**
**हिरव्यागार सावलीवर..!**
**तेव्हा अंगणात नष्ट झालेली असते**



**बापलेकाच्या नात्यातली**
**ओलसर पालवी..!**

बाबांच्या आठवणी आणि बाप ह्या शब्दाचे महती सांगण्यासाठी संपूर्ण आयुष्य कमी पडेल अशी परीस्थिती असते. बापाचे अनेक पैलू मी जवळून पाहिले आहेत, माझी मुलगी लहान असताना माझे मित्र सिद्धेश्वर गाडगे यांच्या कन्येच्या लग्नासाठी पत्रिकेमध्ये जेव्हा मी एक कविता लिहिली तेव्हा त्यातील प्रत्येक ओळीच्या मागे एक बाप होऊन स्वतःची मुलगी उद्या सासरी गेल्यावर कसे ? हा विचार करून मी रडत होतो. हा बाप मुलीच्या लग्नाच्या वेळी मुलगी हे परक्याचे धन आहे त्यामुळे तुम्ही रडू नका असे आपल्या पत्नीला सांगतो त्यावेळी तो स्वतः मनातल्या मनात रडत असतो ह्या जाणिवेतून एका कवितेत मी लिहिले,

**"अहो, लेक म्हणजे परके धन " बाबा सांगतसे**
**आईला हसून; मात्र लेकीला कळते आपोआप**
**बाबा रडतोय मोठ्ठयाने आतून**

स्वतः मनातून रडत असताना मुलीच्या आईला दिलासा देण्याचे काम सुद्धा हा बाप करत असतो हे विशेष. सैराट चित्रपटात मला सर्वात दुर्दैवी वाटला तो आर्चीचा बाप, खूप सामाजिक चर्चा त्या चित्रपटावर झाल्या मात्र स्वतःच्या घराला मुलीचे नाव देणारा, साधारणपणे दहाव्या वर्गात असतानाच मुलीच्या हातात बुलेट देणारा, आपल्या बायकोने पापड कुरडया केल्या त्या मुलीने बुलेट खाली चूरडल्या तरी हरकत नाही इतकी मुभा आणि मोकळीक आपल्या मुलीला देणारा बाप आपली मुलगी दोन दिवसाच्या क्षणिक प्रेमासाठी आपली संपूर्ण इभ्रत आणि प्रेम पायाखाली तुडवून जात आहे हे होत असताना त्याच्या मनाला पडणारे चरे हे सुद्धा नागराज मंजुळे यांनी कुठेतरी अधोरेखित करायला पाहिजे होते असे मला सुरुवातीपासून वाटते. एका साउथ मधील चित्रपटात एक विलन फार लाखमोलाची गोष्ट बोलून गेला आहे तो म्हणतो , " हर लडकी के जीवन में दो फेज होते है, before love her father is his hero, after love her father is vilen for her life." या विषयावर चर्चा करायची तर संस्कृती पासून संस्कारापर्यंत अनेक गोष्टीची चर्चा करावी लागेल मात्र आयुष्य लेकरांसाठी पणाला लावणारा बाप दोन दिवसात तुमच्या आयुष्यात येणाऱ्या प्रियकर किंवा प्रियसी साठी कवडीमोल कसा होऊ शकतो ? हा प्रश्न मला सातत्याने पडत आला आहे. एका दुसऱ्या मित्राच्या बहिणीच्या लग्नाची पत्रिका तयार करताना सुद्धा स्वतःच्या मुलीकडे पाहून बाप म्हणून मला रडे थांबवता आले नाही त्या ओळी पुढील प्रमाणे

**तुझ्या नितळ तळव्यावर गर्द मेहंदी रंगली**
**माझ्या अंगणात आंब्याची डहाळी सजली**
**मांडवाखाली बघ सारी वरात जमली**
**का ग चिमणे तुझी माझी पापणी भिजली ?**
**चारा खा पाणी पी भुर्रकन उडून जा**
**इतका सोपा अर्थ काढू नकोस पोरी**
**काळजाचा तुकडा जपण्यासाठी**
**ह्या बापाजवळ नाही तिजोरी !**

बाप मुलीला सर्व सुख देतो मात्र त्याच्याजवळ मुलीला जपण्यासाठी कोणतीही तिजोरी नसते. लेकीला दुसऱ्याच्या ताब्यात देताना त्याच्या मनातील शब्द नेमके काय असतील असा विचार करून मी वरील ओळी लिहिल्या. पुढे ह्या ओळी काही सूत्रसंचालक मित्रांनी लग्नप्रसंगी वापरून अनेक ठिकाणी दाद मिळवली. अनेकांनी माझे नाव घेतले अनेकांनी स्वतःच्या नावाने चालवली मात्र नावाच्या पेक्षाही बापाच्या मनातील नेमके स्पंदन आपल्याला मांडता आले याचा मला जास्त आनंद होता याचे कारण मी स्वतः एका मुलीचा बाप आहे हे असू शकते असे मला वाटते .

या शब्दाचे माझ्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे संपूर्ण महाराष्ट्र पंढरपूरच्या विठ्ठलाचा धावा करत असतो तेव्हा मला असे वाटते की बापा पेक्षा विठ्ठल ही मोठा नाही.

**बाप कातळातून वाहे, बाप गोड्या पाण्याचा**
**रे झरा आता राहू दे पंढरी, बापातच दिसे मला**
**पांडुरंग खरा त्याच्या हृदयात ज्ञाना नामा अन**
**डोक्यात तुका चोखा 'पुंडलिकाच्या विटेवर'**
**पहा बाप लेकरांच्या साठी उभा**

बापाच्या हृदयातच ज्ञानदेव तुकाराम आणि नामदेव चोखामेळा असे संत आहेत आणि विठ्ठलाच्या रूपाने साऱ्या जगाचा बाप चंद्रभागेच्या काठी विटेवर उभा आहे असे सर्वजण म्हणत असले तरी लेकरांच्या साठी मात्र बापातच खरा पांडुरंग नांदत असतो. बाप कोणाचाच लहान नसतो प्रत्येकाच्या जीवनातील सर्वात महान पुरुष कोणी असेल तर त्या व्यक्तीचा बाप असतो असे मला वाटते. शहाजीराजे जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांना भेटायला आले तेव्हा छत्रपती शिवाजी महाराज शहाजीराजांच्या चपला हातात घेऊन चालत होते हा पितृभक्तीचा इतिहास आपण अभिमानाने सांगतो मात्र बापाचा तुटलेला चष्मा आणि बायकोचा उन्हाचा गॉगल ह्या पैकी फक्त एकच वस्तू आणण्याची वेळ आपल्यासमोर आली तर आपण नेमके कशाला प्राधान्य देतो याचा विचार करण्याची सुद्धा गरज आहे असे मला वाटते. आमच्या बापान आमच्यासाठी काही केलं नाही असं सांगणारे कित्येक लोक मला भेटले त्या सर्वांचे मत चुकीचं असेल असं मला म्हणायचे नाही. मात्र काही करता येण्यासारखी परिस्थिती नसली तरच नाईलाजाने बाप हातावर हात ठेवून बसतो असे मला वाटते. बाप तुम्हाला शिक्षण देतो, जगण्याची रीत शिकवतो, असला तर पैसा पुरवतो, पैसा नसला तर संघर्षाचा वस्तूपाठ घालून देतो आणि आलेल्या परिस्थितीला लढण्याचे बळ देतो. तुमची परिस्थिती बदलण्यासाठी स्वतः कष्ट करतो आणि प्रसंगी तुम्हालाही संघर्ष आणि कष्ट करायला लावतो. असे असताना आजची पिढी बापाच्या कर्तव्यपूर्तीची फलश्रुती कशी करतो याचे विविध उदाहरणे पाहिल्यावर मी लिहिले

**आज साहेबांच्या खोलीत**
**कोणत्या रंगाचा एसी बसवला**
**बापाने विचारले**
**जुनाट पंख्याच्या खडखडाटात**
**आणि म्हातारीही मोकळी झाली**
**न पाहिलेला रंग सांगून**

हे आजच्या जीवनाचे प्रचंड तापदायक वास्तव आहे तुमच्या माझ्या शब्दाने निश्चित बदलणार नाही मात्र बापाचे महत्व कायम आहे कायम राहील ते कोणत्याही युगामध्ये बदलणार नाही हे निश्चित.

# व्यक्तीचा नाही तर शक्तीचा सन्मान होत असतो




गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आपल्या आयुष्यात आपल्याला मान, सन्मान मिळावा हि प्रत्येकाची मनोमन इच्छा असते . पण खरंया अर्थाने विचार केला तर आयुष्यातील हा सन्मान आपल्याला आपण एक व्यक्ती आहेत म्हणून खरच मिळतो का? तर नक्कीच मिळत नाही. फक्त व्यक्ती म्हणून सन्मान मिळणं महाकठिण आहे.आपली पुजा होण्यासाठी आपल्याला शक्ति बळ अर्जित करावं लागेल . आपलं सामर्थ्य निर्माण करावं लागेल त्या साठी अहोरात्र प्रचंड मेहनत करून प्रसंगी वेळेसोबत कठिण संघर्ष करून आपल्याला मजबुतीने उभा राहव लागेल. आपल्या आयुष्यात आपलं बलस्थान निर्माण करावं लागेल. कारण सन्मान असो कि पुजा हि सदैव बलस्थान शक्ति,पद, सत्ता याची होतं असते . व्यक्ति निमित्त मात्र असतो .**

व्यक्ति म्हणून सन्मान मिळत नाही त्याच प्रमाणे नुसत्या व्यक्तिची पुजा होण पण खुप कठिण आहे. महणुन आपल्या जीवनात आपण आपलं बलस्थान मजबूत केल पाहिजे.सामाजिक पातळीवर असो अथवा व्यक्तिगत पातळीवर सन्मानाचा निकष काय ? तर शक्ति ताकद बळ , सामर्थ्य हेच सन्मानिय असतं पुजनिय असतं .बाकि व्यक्ती हा नाममात्र असतो जो पर्यंत बळ तो पर्यंत सन्मान होतो . म्हणून व्यक्ति हा सन्माननीय नाही तर त्या व्यक्तीकड धारण अर्जित शक्ति दर्जा पद जो पर्यंत आहे तोपर्यंत लोक पुजा करतात सन्मान करतात पण पद संपुष्टात आलं दर्जा संपला कि लोक त्यांचं व्यक्तिकड पुर्ववत पाहत नाहीत अथवा सन्मान देत नाहीत हे वास्तव आहे. लोकांना आपल्याकडं किती ज्ञान विद्वत्ता गुणवत्ता आहे याशी फार काही देणंघेणं नसतं . म्हणजे लोकांचा आपल्या ज्ञान अज्ञानात फार रस मुळीच नसतो . आपण अर्जित केलेल्या शक्ति मध्ये शक्ति हि ताकद आहे शस्त्र अस्त्र सर्व काही आहे आपल्या कडे शक्ति नसेल तर आपण निरूपयोगी आहेत .जो चमत्कार दाखवेल त्याला नमस्कार करणार युग हे आहे. आपल्याकडं कोणत्याही प्रकारची शक्ति नसेल तर लोक आपल्याला नमस्कार घालायला पण दुर्लक्ष करतात आणि आपल्याकडं उच्चतम पद असेल तर किती हि वेळ लागला तरी लोक भेटण्यासाठी गर्दी करतात तसंच एका क्षणाच्या भेटीसाठी कित्येक तास वाट पाहत थांबतात हे आजच्या जगाच भयानक वास्तव आहे.महणुन स्वतःला कमजोर समजु नका प्रयत्न करा मेहनत करा यश शक्ति अर्जित करा .लोक सन्मान करण्यासाठी लाईन लावतील पण आपलं अस्तित्व निर्माण झाल्याशिवाय सन्मान होणार नाही.महणजे सन्मान हा आपला नाही तर आपण अर्जित केलेल्या शक्तिचा होत असतो. म्हणून सन्मान मिळवुन देणारी शक्ति अर्जित करा. समाजात कोणत्याही व्यक्तिची पुजा होते सन्मान होतो तेव्हा लोक हा सन्मान हि पुजा व्यक्तिमत्त्व म्हणून करत नाहीत तर त्या व्यक्तीकड अर्जित केलेलं जे पद आहे शक्ति आहे त्याची पुजा करत असतात . शक्ति म्हणजे शारीरीक बळ नाही तर सामाजिक पातळीवरील सत्ता पावर हि शक्ती आपलं मुल्यमापन निश्चित करत असते.आपण आपल्या पेक्षा मोठ्या पदस्थ व्यक्तिची वाट पाहतो तर आपल्या पेक्षा कमी पदस्थ व्यक्तिला दुर्लक्षित करतो हा मानवी स्वभावाचा भाग आहे. याला अपवाद पण अनेक लोक असु शकतात. क्षेत्र कोणतही असु द्या त्या क्षेत्रातील उच्च शक्ति हिच पुजनिय ठरते. महणुन वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य करणारी जे काही शक्ति केंद्रीत व्यक्तिमत्त्व आहेत त्यांच्या मागे लोकांची रांग हि मुंग्या सारखी लागते पण हेच वलय अथवा बलस्थान नष्ट होताच लोक काढता पाय घेतात . हे अगदी कटु सत्य आहे.मानवी जीवनात व्यक्तिच मुल्यमापन होण गरजेच आहे.पण दुर्दैवाने असं होतं नाही .मानवी जीवनात जे काही अपेक्षित असतं त्या पासुन आपण कोसो दूर असतो. आणि जे क्षणिक असत त्याच भोवती आपण फिरतो . मुळात जीवन हितार्थ काय हे खुप गरजेचं आहे. प्रतिष्ठा सन्मान हि क्षणिक असते पण याची आपल्याला भुरळ पडते . आणि जीवनाच्या वास्तविक उद्देश पासुन आपण दुर जातो.आणि इथंच आपली गडबड होते .आपण आपलं कार्य करताना अथवा यथा योग्य योगदान देताना इमानेइतबारे दिलं पाहिजे.बाकी मान ,सन्मान अपमान हा काही महत्वाचा भाग नाही. आत्म्याचे हित काय आहे हे समजुन आपलं आत्महित कसं होईल हे समजलं पाहिजे आणि ते साध्य करण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत.

# शिंदेसाहेब, ही जाहिरात तयार करणाऱ्याला 'महाराष्ट्र-भूषण' द्या!



मधुकर भावे
ज्येष्ठ पत्रकार

आधुनिक केसरी

**सध्या महाराष्ट्र ताण-तणावाखाली आहे. राजकीय तणाव आहे. सामाजिक तणाव आहे. मानसिक तणाव आहेच... शहरांत वाहतूक कोंडी आहे. चार-चार पाच-पाच तास वाहतूक कोंडीत जीव गुदमरत आहे. प्रवास लवकर व्हावा म्हणून महामार्ग झाले. पण, या महामार्गावर एका टँकरला आग लागते... आणि मुंबईच्या बाजूला चार तास आणि पुण्याच्या बाजूला चार तास वाहतूक ठप्प राहते.... प्रवास करणारे वृद्ध, रुग्ण, डायबेटीसवाले, या सर्वांच्या हालाला सीमा नाही. नाशिकला जायला पाच-सहा तास लागताहेत.... पुण्याची स्थिती तीच झाली आहे. बाजारात महागाई आहे. बेरोजगारी तर भरपूर आहे. रोजगार नाही ते तरुण टपोरीपणाकडे वळत आहेत.... धमक्या सुरू आहेत... मधून मधून दंगली घडवल्या जात आहेत. हे सगळे का होते आहे.... कोण करते आहे.... कशाकरिता करते आहे... याची चर्चा सगळे करताहेत... सगळ्यांना उत्तरं माहिती आहेत... पण, 'सहन करता येत नाही... आणि बोलताही येत नाही'.... इतक्या तणावाखाली लोकं आहेत.... कांद्याला भाव नाही म्हणून शेतकऱ्यांना कांदा फेकून द्यावा लागला. टोमॅटोला भाव नाही म्हणून टोमॅटो उत्पादकांची हालत खराब आहे. तिकडे विदर्भात तर आता खरिपाच्या कापूस पेरणीचा हंगाम समोर आला आहे. पण, गेल्यावर्षीचा कापूस कास्तकाराला घरात भरून ठेवावा लागला आहे. त्या गरिब कास्तकराची घरे म्हणजे महाल नव्हेत.... खोल्या- दोन खोल्यांची कौलारू बैठी घरे.. त्यात चुली पेटवणे... घराच्या बाहेर पाणी तापवायला चुलाण टाकणे... श्रमणारा शेतकरी विडी-काडी ओढणारा...**

भरून ठेवेलेल्या कापसाला आग लागण्याची एवढी भिती असताना आज भाव मिळेल... उद्या भाव मिळेल म्हणून वाट बघत हजारो शेतकरी घरात बसलेत... अवकाळी पावसाने नुकसान करूनच टाकले आहे. सरकारच्या ते गावीसुद्धा नाही. मदतीच्या घोषणा वृत्तपत्रांच्या पानावर राहिल्या. प्रत्यक्ष किती मदत पोहोचली... घोषणांपर्यंतच थांबली. आज विदर्भात अशी स्थिती आहे की, तीन हजारांच्या खाली कापसाचा भाव पडला आहे. सरकारची योजना कागदावर आहे. एक काळ असा होता की, नागपूरच्या कॉटन मार्केटमध्ये महाराष्ट्र शासनाच्या 'एकाधिकार कापूस खरेदी'चा दबदबा होता. आज ती योजना कागदावरच राहिली आहे. पडलेल्या भावात कापूस विकायला शेतकरी तयार नाहीत... ६ हजार रुपये भाव मिळणे शक्य नाही... कोणी देतही नाही... कारण शेतकऱ्याच्या बाजूने बोलणारे आहे कोण? सरकारला सध्या गतिमान जाहिराती करण्यात इतका वेळ चालला आहे की, मुख्य प्रश्न सगळे बाजूला पडलेले आहेत. लोकांच्या जीवन-मरणाचे प्रश्न आहेत. त्याकडे पहायला वेळ नाही... 'सरकार आपल्या दारी' आल्याची घोषणा आहे. पण, सगळे लक्ष आकडेवारी आणि टक्केवारीत आहे. किती टक्के मतं कोणाला आहेत.... आणि कोण पुन्हा पंतप्रधान आणि कोण पुन्हा मुख्यमंत्री... याचे हिशेब पान-पान जाहिराती करून झळकवले जात आहेत. सध्या खूष आहेत ती वृत्तपत्रे. कारण शिंदे सरकार आल्यापासून जाहिरातींना तोटा नाही.... रोज एक 'गतिमान' जाहिरात पहिल्या पानावर पूर्ण पान....आणि सर्वच वृत्तपत्रांना.... अगदी 'सामना'सुद्धा. शिंदे उदार आहेतच.... पेपरवाल्यांमध्ये तरी कोणीच नाराज नको... मिडिया खूष.... पेपरवाले खूष.... पेपरवाल्यांना तर शिंदे सरकार पर्वणीच ठरली आहे. या व्यवसायात आयुष्य घालवले आहे.... त्यामुळे थोडीशी माहिती आहे.... पहिल्या 'गतिमान' पानाचे दर ..... मग थोडी गती कमी झालेल्या दोन नंबर पानावर आणि नंतर तीन नंबर पान.... मग बातमी वाचायची सुरुवात पान नंबर तीन किंवा चार.... मग तिथेही बातम्या काय...? याला धमकी... त्याला धमकी... या पाच मंत्र्यांना काढाचा आदेश... मग मंत्रीमंडळ विस्तार... राजकीय बातम्यांनी वाचक कंटाळून गेला... त्याचे प्रश्न इतक्या ऐरणीवर आलेले आहेत की, ते कोणते प्रश्न आहेत.... हे समजण्याच्या पलिकडे सरकार निघून गेले आहे,... असं वातावरण महाराष्ट्रात कधीच नव्हते. महाराष्ट्रातील नगरपालिका आणि महापालिका निवडणुका, मे २०२४ मधील लोकसभा निवडणूक आणि ऑक्टोबरमधील विधानसभा निवडणूक, या पैकी कोणत्याही निवडणुकीचा काही पत्ता नाही. लोकसभा निवडणुका झाल्याशिवाय महापालिकेच्या निवडणुका तर होणारच नाहीत. लोकसभेच्या बरोबर विधानसभेची निवडणूक होऊ शकेल... पण, लोकसभेची निवडणूक मे महिन्यात होईलच, हेही कोणाला ठामपणे सांगता येणार नाही. कारण राजकारण आता एवढे निसरडे आहे की, आजचं उद्या खोटं ठरतं... आणि उद्याचं परवा भलतच काहीतरी होऊन जातं... या सगळ्या मनस्तापात थोडासा तणाव कमी व्हावा म्हणून आणि विरंगुळा व्हावा म्हणून मंगळवा दिनांक १३ जून रोजी एक छान जाहिरात आली... सर्वच वृत्तपत्रांत पहिल्या पानावर प्रसिद्ध झाली. शिंदे शिवसेनेच्या वतीने ती जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. त्यात महाराष्ट्रातील जनतेचे खूप-खूप आभार मानले आहेत. जाहिरातचे शिर्षक इतकं मोठं आहे की, निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर 'अमूक विजयी आणि तमूक विजयी', अशी जशी हेडलाईन असते... तशा थाटात ती जाहिरात आहे. 'राष्ट्रामध्ये मोदी.... महाराष्ट्रात शिंदे' एखाद्याला वाटेल निवडणूक कालच झाली आणि आजच निकाल लागला..... अर्थात ही जाहिरात ज्या कोणाच्या सुपिक डोक्यातून निघाली... (प्रसिद्धीपूर्वी ती छापण्याला मंजुरी घेण्यातच आलीच असेल...) त्या माणसाच्या सुपिक डोक्याची कमाल आहे... इंग्रजी किंवा मराठी वृत्तपत्राने हा माणूस शोधून काढून त्याला भल्या मोठ्या पगारावर त्यांच्या त्यांच्या वृत्तपत्राचा जाहिरातप्रमुख म्हणून ताबडतोब घेवून टाकावे. जाहिरात वाचल्यानंतर ताण-तणाव असलेल्या महाराष्ट्राला एकदम हलकं वाटलं... कारण




जाहिरातीतच सांगून टाकले आहे की, एका नागरिक पाहणीत असा कौल मिळाला आहे की, भारतीय जनता पक्षाला ३०.०२ टक्के लोकांनी पसंती दिली आहे. आणि शिंदे शिवसेनेला १६.०२ टक्के लोकांनी पसंती दिली आहे. या दोघांची एकत्रित मतं ४६.०४ टक्के आहेत. खाली आणखीन एक मस्त मजा आहे... काय डोकं आहे त्या माणसांच.... एकनाथ शिंदे यांना महाराष्ट्रातील जनतेला मुख्यमंत्रीपदी पुन्हा आणायचे आहे आणि त्याला महाराष्ट्रातील २६.०१ टक्के लोकांची पसंती मिळालेली आहे.... त्यापुढे आणखीन एक मजा आहे... देवेंद्रजी फडणवीस यांना २३.०२ टक्के मतदारांनी मुख्यमंत्रीपद देवून टाकलेले आहे. या दोघांची एकत्रित बेरिज करून ४९.०३ दाखवलेली आहे. त्याचे दोन वेगळे अर्थ आहेत... १) एकनाथ शिंदे यांना महाराष्ट्रातील ७४.९९% मतदारांनी मुख्यमंत्रीपदासाठी पसंती नाकारलेली आहे....
२) 'मीच पुन्हा येईन...' असा छान राजकीय संदेश नेहमी देणारे बिचारे देवेंद्र फडणवीस यांना ७६.९८% मतदारांनी मुख्यमंत्रीपदासाठी पसंती नाकारलेली आहे. जाहिरातीत दोघांच्या मुख्यमंत्रीपदाची बेरिज करून ती ४९.०३ % अशी दाखवली आहे. म्हणजे राहिलेल्या ४९.०७% लोकांनी दोघांनाही नापसंती दिली आहे. ज्यांचे गणित कच्चे आहे, त्यांनासुद्धा हे गणित पटकन समजून आले. मुख्यमंत्र्यांसोबत कोल्हापूरला दौऱ्यावर निघणारे देवेंद्र फडणवीस यांनी सकाळी लवकर उठून... तयार होऊन चहा घेता घेता पहिल्या पानावरची जाहिरात बघितली आणि त्यांची तब्बेत बिघडली, अशी जोरदार बातमी सगळीकडे पसरली. त्यांनी कोल्हापूरला जाणे रद्द करून टाकले. त्याची कारणं दोन असावीत.... एक तर मुख्यमंत्रीपदाच्या परिक्षेत फडणवीसांपेक्षा एकनाथ शिंदे यांना २.०९ टक्के लोकांनी अधिक पसंती दाखवली आहे. त्यामुळे 'पुन्हा मीच येईन' मध्ये ही दोन टक्क्यांची अडचण येवून उभी राहिली! आता हा दोन टक्क्यांचा फरक पंतप्रधान मोदीसाहेब किंवा अमित शहा हे भरून काढतील... एवढी एकच आशा आहे. तसं झालं तर मग शिंदेसाहेबांचे काय? असाही प्रश्न आहे. जाहिरात तयार करणाऱ्याने सगळ्या महाष्ट्रालाच चक्रावून टाकलेले नाही तर, मोदी-शहा हे सुद्धा इतक्या जबरदस्त डोक्याच्या माणसाचं कौतुक करत असतील... आजपर्यंत अनेक पक्षांत सल्लागार म्हणून काम करणारे प्रशांत किशोर यांचा दबदबा होता... ते कधी काँग्रेसकडे जायचे... कधी दुसऱ्या पक्षांना सल्ला द्यायचे.... ममता बॅनर्जी यांच्याकडेही ते सल्लागार म्हणून होते... फुटबॉल हातात घेवून प्रचारसभेला जा... हा त्यांचाच सल्ला होता. पण, हे सगळे सल्ले या जाहिरातवाल्याच्या डोक्यापुढं काहीच नाहीत.... त्यामुळे संबंध महाराष्ट्रात अशी काही खळबळ झाली की, दुसऱ्या दिवशी लगेच झी टीव्हीचा आधार घेवून जनेतेच्या चरणी माथा टेकला गेला... आणि महाराष्ट्राचा जयजयकार करून जनतेच्या मनातील महायुतीचे आपले सरकार, अशी जाहिरात झळकली... वरच्या रांगेत मोदी- शहा- बाळासाहेब ठाकरे- आनंद दिघे यांचे फोटो आणि खालच्या रांगेत भाजपाच्या एकाही मंत्र्याचा फोटो नाही.. ज्या पाच मंत्र्यांना काढा... मग मंत्रिमंडळाचा विस्ताराची परवानगी, अशा अमित शहा यांच्या नावाने ज्या बातम्या आल्या त्या पाच मंत्र्यांसकट शिंदे गटाच्या नऊ च्या नऊ मंत्र्यांचे फोटो.... आता शिंदे यांच्या मंत्रिमंडळात जे भाजपाचे मंत्री आहेत, त्यांना क्षणभर असे वाटेल की, आपल्याला वगळून टाकले की काय...! म्हणून त्यांनी धडाधड फडणवीस यांना फोन लावले... आता पुन्हा दोन दिवसांत सगळ्या मंत्र्यांच्या छायाचित्रासह जाहिरात येवू शकते... भाजपामधील कुणीतरी चाणाक्या ने तसाही सल्ला दिला असेल.... गतिमान सरकारला रोज एक पानभर जाहिरात द्यायची अशी काही सवय झाली आहे.... की, आता सकाळी उठल्यावर सरकारची 'गतिमान' जाहिरात जर नसेल तर अनेक मंत्र्यंना चहाचा घोट घेणे कठीण होऊन बसले आहे.... बाकी महाराष्ट्राचे ढीगभर प्रश्न कोणते का असेनात.... आणि ते किती काळ पडलेले असेनात... जाहिरात आणि घोषणाबाजी या दोन मुद्यांवर सरकार आणता येईल, अशी खात्री वाटल्यामुळेच सुपिक डोक्यांना हाताशी धरले गेले आहे. पण आणखीन गंमतशीर बातमी होती... मुख्यमंत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीत अब्दुल सत्तारांना झापल्याची बातमी.... त्याच बातमीम खरिपाच्या हंगामात शेतकऱ्यांना मदत करण्याकरिता बोगस बियाणे वाटप होऊ नये याची चर्चा झाल्याची बातमी दिली गेली आहे. खरिपाच्या हंगामाची तयारी कृषीमंत्र्यांकडून एप्रिलपासून सुरू होते. विभागवार बैठका होतात... कृषीमंत्री आणि कृषी अधिकारी यांच्याकडून दोन महिने आधी पूर्ण आराखडा तयार केला जातो... पाऊस लांबला आहे... पण, ७ जून हा मृग नक्षत्राचा ठरलेला दिवस. त्या दिवसापासून पावसाची अपेक्षा... एप्रिल, मे ऐवजी खरिप हंगामाची चर्चा महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात १३ जूनला झाली. सरकारच्या 'गतिमान' जाहिरातीचाहा एवढा परिणाम फारच गमतीचा वाटला. कृषीमंत्र्यांनाच त्याची काही माहिती नाही. आणि जाहिरात, उद्घाटने, देवदर्शने यामध्ये सरकारला वेळ नाही. अशी सगळी महाराष्ट्राची आजची दैना असताना मतदानाच्या टक्केवारीचे वाटपसुद्धा होवून गेलेले आहे. प्रसिद्ध झालेल्या टक्केवारीप्रमाणे मोदीसाहेब पंतप्रधान होणार, हे ठरून गेले आहे. शिंदेसाहेब मुख्यमंत्री होणार, हे ठरलेले आहे... आता अमित शहा आणि फडणवीस या दोघांचाच प्रश्न शिल्लक आहे... बाकी लोकांच्या प्रश्नाबद्दल जाहिरातीत कधी चर्चा होत नसते... एकूण ही धमाल जाहिरात आहे. जाहिरात तयार करणारे... त्याला मान्यता देणारे.... त्या जाहिराती छापणारे... त्या जाहिरातीचे लोखो रुपयांचे पेमेंट करणारे... आणि त्या जाहिराती वाचणारे सगळेच कसे धन्य झालेत.. कारण दोन लोकांची निवडणूक झाली आणि त्यांची पदं पण जाहीर झाली. बाकीच्यांचा प्रश्न हळूहळू सोडवता येईल. त्यामुळे बाकीच्यांनी घाई करू नये... १३ जूनच्या वृत्तपत्रांतील जाहिरात तयार करणाऱ्या सुपिक डोक्याला 'महाराष्ट्र-भूषण' पुरस्कार द्यायला काहीच हरकत नाही. बाकी कोणाला दिला नाहीत तरी चालेल... पण, अशी जाहिरात आजपर्यंत कुणी करू शकले नाही. या विक्रमाबद्दल त्याचा सन्मान व्हायलाच पाहिजे. आणि तो सन्मान 'महाराष्ट्र-भूषण' या पुरस्काराखेरिज कशाने होणार आहे? सध्या एवढेच

# रक्तदान करून बघा, कसं छान वाटतं!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**रक्तदान केल्याने आपल्या शरीरावर कोणताही दुष्परिणाम होत नाही. जे लोक ऐच्छिक रक्तदान करून जीवनदान करतात, त्यांचे आभार मानणे व नवीन लोकांना रक्तदानास प्रवृत्त करणे, असे जागतिक रक्तदाता दिवसाचे प्रमुख उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. दरवर्षी १४ जून रोजी संपूर्ण जगातील रक्तदात्यांचा सन्मान दिवस म्हणून जागतिक स्तरावर साजरा केला जातो. रक्त संक्रमणासाठी सुरक्षित रक्त व रक्त उत्पादनांची आवश्यकता, राष्ट्रीय आरोग्य यंत्रणेत स्वयंसेवी आणि विनाअनुदानित रक्तदात्यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाविषयी जागतिक जागरूकता वाढविणे, हाही यामागील हेतू आहे.**

हा दिवस सरकार आणि राष्ट्रीय आरोग्य अधिकाऱ्यांना आवश्यक संसाधने उपलब्ध करुन देण्यासाठी, स्वेच्छा, मोबदला न मिळालेल्या रक्तदात्यांकडून रक्त संग्रह वाढविण्यासाठी तसेच यंत्रणा व पायाभूत सुविधा तयार करण्यासाठी कृती करण्याची संधी प्रदान करतो. शास्त्राप्रमाणे जीवनदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. सामान्य व्यक्तीही रक्तदान करून दुसऱ्याचा जीव वाचवू शकते. आज संपूर्ण जगभरात जागतिक रक्तदाता दिन साजरा होत आहे. रक्तदात्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी सन २००४पासून जागतिक आरोग्य संघटना १४ जून रोजी जागतिक रक्तदाता दिवस साजरा करत असते. आजदेखील समाजात रक्तदान करणाऱ्यांची संख्या कमी आहे. त्यामुळे रक्तदात्याला रक्तदानास प्रेरित करण्याच्या अनुषंगाने व नियमित रक्तदात्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी २००४पासून जागतिक आरोग्य संघटना हा दिवस साजरा करत असते. ए-बी-ओ या रक्तगटांचा शोध लावणारे आणि रक्तदान संकल्पनेला अधिक शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडणारे ऑस्ट्रियाचे शरीरविज्ञानात नोबेल पारितोषिक प्राप्त डॉ.कार्ल लॅन्डस्टेनर यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस जागतिकस्तरावर साजरा केला जातो. डॉ.कार्ल लॅन्डस्टेनर यांचा जन्म दि.१४ जून १८६८ रोजी ऑस्ट्रियात झाला. त्यांचीच आज जयंती जागतिक रक्तदाता दिन म्हणून पाळण्यात येत आहे. हा दिवस सर्वप्रथम सुरू करण्याकरीता दि.१४ जून २००४ रोजी जागतिक आरोग्य संघटना, रेडक्रॉस आणि आंतरराष्ट्रीय रेड क्रॉसेंट सोसायटी ऑफ इंटरनेशनल फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रयत्न करण्यात आले होते. स्वेच्छेने व मोबदला न घेता सुरक्षित रक्तदान करण्याच्या गरजेबद्दल जनजागृती व्हावी, या उद्देशाने साजरा करण्यात आला. मे २००५मध्ये डब्ल्यूएचओने एका जागतिक आरोग्य असेंब्लीच्या जागतिक रक्तदाता दिनानिमित्त १९२ सदस्य देशांसह अधिकृतपणे समितीची स्थापना केली. जेणेकरुन जगातील सर्व देशांना रक्तदात्यांच्या बहुमोल कृतीबद्दल आभार मानण्यास आणि लोकांचे जीवन वाचवण्यास प्रवृत्त केले जाईल. हा दिवस साजरा करण्याची उद्दिष्टे लोकांना रक्तदानासाठी प्रोत्साहित करणे आणि त्याच्याशी संबंधित गैरसमज दूर करणे आहे. अपघातात झालेला अतिरिक्त रक्तस्राव, पॅलेसोमिया, रक्तक्षय, रक्ताचा कर्करोग, प्रसूतिपश्चात रक्तस्राव, शस्त्रक्रिया आणि इतर गंभीर आजारांमधे योग्यवेळी रुग्णाला रक्त मिळाले नाही तर तो रुग्ण दगावण्याची शक्यता असते. अशावेळी एका मानवाचेच रक्त दुसऱ्या मानवाचे प्राण वाचवू शकते. कारण मानवाचे रक्त कोणत्याही कारखान्यात तयार होत नाही व दुसऱ्या कोणत्याही प्राण्याचे रक्त मानवासाठी उपयोगात येऊ शकत नाही. त्यामुळे रक्तदानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. महाराष्ट्र राज्यात रुग्णांसाठी दरवर्षी सुमारे साडेसात लाख बाटल्या रक्त लागते. ही गरज ७० ते ७५ टक्के पर्यायी बदली रक्तदाता किंवा व्यावसायिक रक्तदात्याकडून भागविली जाते. मानवाच्या शरीरामध्ये साडेचार ते पाच लिटर रक्त असते. रक्तदानाच्या वेळी केवळ ३०० मिली रक्त काढले जाते. प्रत्येक रक्तदानानंतर साधारण ३६ तासांमध्ये शरीरात रक्ताची पातळी पूर्ववत होते. तसेच साधारण २ ते ३ आठवड्यांत रक्तपेशीही पूर्ववत होतात. रक्तदान केल्याने कोणताही त्रास किंवा इजा होत नाही. ब्लड बँकेच्या रेफ्रिजरेटरमध्ये फक्त ४-५ आठवड्यांपर्यंत रक्त सुरक्षित ठेवता येते. रक्तदानामुळे प्रत्येक वर्षी अनेकांना जीवनदान मिळते. अनेक मोठ्या सर्जरींमध्ये किंवा गंभीर परिस्थितीत रक्तदानामुळे रुग्णाचे प्राण वाचण्यास मदत होते. तसेच गरोदरपणात बाळाचे आणि आईचे प्राण वाचविण्यास रक्तदान महत्त्वाचे कार्य करते. आपल्या भारत देशात १२० कोटी लोकसंख्या असूनही केवळ ७४ लाख ते १ कोटी २० लाख लिटर रक्त संकलित होते. रक्त न मिळण्यामुळे मृत्यूचे प्रमाण देशभरात १५ ते २० टक्के आहे. भारतात केवळ ०.६ टक्के लोक रक्तदान करतात. वयाच्या १८ वर्षानंतर ते ६५ वर्षापर्यंत, वजन ४५ किग्रॅच्या वर असल्यास, रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमीत कमी १२.५ ग्रॅम असल्यास, रक्तदाता पूर्णपणे निरोगी असल्यास, अशा निरोगी माणसाला दर ३ महिन्यांनी जवळच्या रक्तपेढीत किंवा कोठेही आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात रक्तदान करता येते. तर रक्तदात्याने आधीच्या ३ दिवसांत कोणतेही प्रतिजैविक औषध घेतलेले असल्यास, रक्तदात्याला मागील ३ महिन्यात मलेरिया झाला असल्यास, रक्तदात्याला मागील १ वर्षात विषमज्वर, कावीळ किंवा श्वानदंश होऊन त्याने रेबीजची लस घेतली असल्यास, त्याची ६ महिन्यापूर्वी मोठी शस्त्रक्रिया झाली असल्यास, गर्भवती महिला, महिलेला १ वर्षाखालील मूल असल्यास किंवा तिचा ६ महिन्यात गर्भपात झाला असल्यास अशांना रक्तदान करता येत नाही. ब्लड प्रेशर लो किवा हाय असणाऱ्यांनी रक्तदान करताना रक्तदाबाची चाचणी करून पहावी, उपाशी पोटी किवा खाऊन झाल्यावर अर्ध्या तासापर्यंत रक्तदान करू नये. तसेच रक्तदानास इच्छुक असणारास इतरही आजारांची चाचणी करून घ्यावी लागते. सद्या तर आपल्या देशात वर्षभरच रक्तदान शिबीरे आयोजित करून भरपूर रक्तसंकलन केले जात आहे. सामाजिक, धार्मिक, आध्यात्मिक, सेवाभावी संस्था रक्तदान शिबीरांच्या माध्यमातून संकलीत रक्तसाठा रक्तपेढ्यांकडे सुपूर्द करीत असतात.

# अलंकापुरीत पोलीस व वारकऱ्यांविषयी भक्तीभावे राजकारण ?

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : २१



मी एस.टी.महामंडळाच्या गाडीने ११ तारखेला जिंतूर, परभणी, झिरोफाटा, वसमत, मालेगाव मार्गे नांदेडला जात होतो. माझी नजर खिडकीतून बाहेरचा भोवताल डोळ्यात साठवत होती. नांगरून, वखरून, कास्या वेचून, सऱ्या काढलेल्या स्वच्छ काळ्या रानातून मी गाडीत बसल्या बसल्या फिरून येत होतो. सकाळी नऊ वाजल्यापासूनच ऊन चटकत होते. रस्त्याच्या डाव्याबाजूने चार दहा किलोमीटरवर काही दिंड्या दिसत होत्या. दिंड्यामधल्या वारकऱ्यांच्या अंगावर पांढरेशुभ्र कपडे, डोक्यावर शुभ्र टोप्या, कपाळावर वैष्णव टिळा, प्रत्येकाच्या हातात टाळ, तल्लीन मृदंग वादकाच्या गळ्यात अडकवलेला मृदंग. अनेकांच्या हातात, तर काहींच्या खांद्यावर भगव्या पताका, काही माऊल्यांच्या माथ्यावर तुळसी वृंदावन. ही सगळी मंडळी अगदी उल्हासाने नाचत अभंग म्हणत भर उन्हात चालत होती. त्यांच्यापुढे सामानसुमान असलेला एखादा टेम्पो किंवा छोटा हत्ती असे एक वाहन धिम्यागतीने धावत होते. ऊन्हाचा पारा वर चढत होता. अशा उन्हात अनेक जण अनवाणीच चालत होते. चेहऱ्यावर कसलाही उद्वेग नाही. चिंता नाही, काळजी नाही, काळजी होती ती फक्त रस्ता मागे टाकण्याची.. ती त्यांच्या चालण्यातून दिसतच होती. काहीजण आलापासह अभंग आळवत असत, बाकीचे एका सुरात झील ओढत असत. टाळांच्या गजरात दिंड्या जात होत्या. मी बसमधून उत्सुकतेने सारखा पहात होतो; तरीही माझं परिवर्तनवादी मन त्यांना वेड्यात काढण्याचा गुन्हा करत होतं ; परंतु ते सर्व बुजुर्ग होते. वेडे कसे असतील ? त्यांनी तर संत नामदेव, तुकारामांच्या वारकरी पंथाची पताका खांद्यावर घेतलेली होती... ती प्पार बाराव्या शतकापासूनचा वारकरी पंथाचा नि संतकुळाचा वारसा जपण्यासाठी...!

**वारीची लागली रे आस देवा |**
**वारीच संत, वारीत संतसेवा ||**

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. महाराष्ट्रात कधीच विकृती निर्माण होऊ नये, असे आम्हां सगळ्यांनाच वाटते; परंतु सत्तेच्या अनेक स्वार्थ्यांकरवी जणू ही विकृती निर्माण करण्याची येनकेनप्रकारेन अहमहमिकाच सुरू असते. या संताच्या भूमीत महाराष्ट्रात अशी काही ठिकाणं आहेत की, त्याच मार्गे आषाढी एकादशीला पंढरपूर यात्रेसाठी महाराष्ट्रातून दिंड्या जातात. गावागावातून वारकऱ्यांच्या अनेक दिंड्या निघतात आणि त्या अनेक ठिकाणाहून देहू, आळंदी मार्गे शेवटी आषाढी एकादशीला पंढरपूरला जाऊन पोहोचतात. जशा अनेक नद्या प्रशांत महासागराला जाऊन मिळतात तद्वत.

यावर्षी दिंड्या आळंदीला पोहचल्या तेव्हा अलंकापुरीत वारकऱ्यांमध्ये व पोलिसांमध्ये थोडासा गोंधळ झाला. मात्र बाचाबाची झाली की, झटापट झाली की, वारकऱ्यांवर लाठीचार झाला याबाबत अनेकांनी वेगवेगळी मते मांडलेली आहेत. या मतांच्या मागेही काही तथ्यांश दडलेला असू शकतो. वारकऱ्यांवर पोलीसांना लाठीचार्ज करण्याची वेळ का येते ? ती खरंच आलीय का ? याबाबत वारकऱ्यांचे चुकले, की पोलीसांचे चुकले, की नियोजन समितीचे चुकले, की गृहखाते नियोजनात कमी पडले, की देवस्थानातील विश्वस्त व पुजारी, विश्वत व गावकरी, विश्वत व संरक्षकांतर्गत काही वाद किंवा काही आर्थिक असामंजस्य असाही काहीसा तर्क लावता येतो. नियोजनाबाबत काही वाद आहेत का ? असतील तर ह्या उपरिनिर्दिष्ट सर्व वादाला अनेक पैलूही असू शकतात. युट्युबवर आळंदीतील वादाबाबत काही क्लिप बघितल्या. याबाबत विश्लेषक सुशील कुलकर्णी यांची एक क्लिप बघितली, त्या क्लिपमध्ये सुशील कुलकर्णी यांनी सप्रमाण असं सविस्तर विश्लेषण केलेलं आहे आणि ते माझ्या मनाला पटलं सुद्धा... आणि त्यात तथ्यांशही दिसून येतो. तरीही हे माझे वैयक्तिक मत आहे वास्तव कदाचित वेगळेही असू शकते. आळदीत दरवर्षी ४७ दिंड्या येतात त्या प्रत्येक दिंडीतील ७५ वारकऱ्यांना पालखी प्रस्थान व दर्शनासाठी पासेस दिल्या जातात. एका दिंडीतील ७५ वारकरी. ७५ गुणिले ४७ दिंड्या म्हणजे एकावेळी ३५२५ वारकऱ्यांना प्रवेश दिला जातो. आळंदीमध्ये अनेक वारकरी शिक्षण संस्था आहेत. त्या शिक्षण संस्थेत हजारो विद्यार्थी आहेत. दर गुरुवारी आळंदीत पालखी निघते. त्या पालखीची हे विद्यार्थी सेवा करतात. दर गुरुवारी या पालखीची सेवा करणाऱ्या सेवेकरी विद्यार्थी वारकऱ्यांचा असा आग्रह होता की, या दिंड्यासोबत आम्हालाही मानकरी होता यावे. असा हट्ट या विद्यार्थ्यांनी केला होता म्हणे ! विश्वस्त मंडळींनी त्यांना सांगितले की, हे वारकरी फक्त वर्षातून एकदाच येतात म्हणून त्यांना त्यांचा मान द्यायला हवा...परंतु ह्या वारकरी शिक्षण संस्थातील अनेक विद्यार्थ्यांनी मानाच्या दिंडीच्या वारकऱ्यांसोबतच आम्हाला जायचे असा हट्ट केलाच आणि या हजारो विद्यार्थ्यांनी घुसखोरी केल्यामुळे ह्या विद्यार्थ्यांनाच थांबवण्यासाठी पोलीस बलाचा वापर करावा लागला, तो करण्यात आला. या विद्यार्थ्यांसोबत असणाऱ्या अनेक वारकऱ्यांनाही धक्के, लोटालोटी करण्यात आली. ह्या जमावाला नियंत्रित करताना हा प्रकार घडलेला आहे. हे अनेक व्हिडिओमध्ये दिसून येते ; मात्र पोलिसांकडून बाहेरच्या वारकऱ्यांना एकही काठी मारण्याचे धाडस केले गेले नाही, असे सुशील कुलकर्णी यांनी आपल्या क्लिपमध्ये पुराव्यासहीत विश्लेषण केले आहे, ते वास्तव स्वरुपाचे वाटते; परंतु हा विषय राजकीय वळणावर येऊन ठेपलाच आहे, तर त्याच्यामागेही गर्भित अन्वयार्थ दडलेला असू शकतो. गृहमंत्री म्हणाले काहीच अनुचित प्रकार घडलेला नाही. झटापट, व बाचाबाची झालेली आहे ; मात्र विरोधी पक्षाचे नेते वारकऱ्यांवर लाठीचार्ज झाल्याचे सांगत आहेत. झालाच असेल तर तो स्थानिक वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यावर. एका व्हिडिओ क्लिपमध्ये एका वारकरी विद्यार्थ्याने सांगितले की, पोलीसांनी आम्हां चौघा जणांना एका खोलीत नेऊन मारले. त्याच्या कोपराजवळ रक्ताचा डागही पडलेला तो दाखवत होता; परंतु वरील सर्व प्रकारची वारकरी विद्यार्थ्यांच्या पराक्रमाची नियोजित कारणे या वादाला जर कारणीभूत असतील तर ...महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायात व प्रशासनात घडलेल्या कलहाची जगभर जाहिरात करून या पवित्र परंपरेला आपणच गालबोट लावत आहोत का ? असंही आपल्याला वाटायला हवं.

महाराष्ट्रातील वारकऱ्यांमधील सहिष्णुता कधीच अनुचित प्रकार घडू देणारी नाही, याची हमी महाराष्ट्राचा वारकरी संप्रदायच आपल्या सोज्वळ, सात्विक,सहिष्णु भूमिकेतून दाखवून देत आला आहे. तो यापुढेही दाखवून देऊ शकतो !

# हिंदु राष्ट्राचं स्वप्न ! बोंबलू नको लेका गप्प न !



हेमंत टाले
संपर्क क्र. 9975807632

आधुनिक केसरी

**मित्रांनो हिंदू राष्ट्राच्या निर्मितीच्या संदर्भात दोन गोष्टी सांगितल्या जात आहे. अलीकडेच अकोला येथे प्रदीप मिश्रा(अंधश्रद्धा शिरोमणी) नावाचा हिंदू राष्ट्राचा पुरस्कर्ता येऊन बोलून गेला की संविधान को बदलो हमको हिंदुराष्ट्र बनाना है अर्थात दोन गोष्टी महत्त्वाच्या आहे. त्यांना हिंदूराष्ट्र निर्मितीसाठी सुरुवातीला संविधान बदलवायचं आहे. याचा अर्थ या देशाला जेव्हा संविधान लाभलं त्याच्या पूर्वीचा जो काळ होता तो म्हणजे मनूच्या कायद्याचं राष्ट्र. या भारत वर्षामध्ये दोन हजार वर्ष मनूच्याच कायदा राज्य होतं आणि पुन्हा या तथाकथित हिंदुराष्ट्र वाद्यांना संविधान पूर्व काळातील मनुच्या कायद्याने चालणारं मनू राज्य प्रस्थापित करायचं आहे.**

ज्याला त्यांनी हिंदुराष्ट्र हे गोड नाव दिलेलं आहे. इथल्या बहुसंख्य हिंदू बांधवांचं शोषण करून त्यांना गुलामीच्या खोल खड्ड्यात लोटून देणारं मनूराज्य आणण्यासाठी इथल्या बहुसंख्य हिंदू बांधवांना लिहिण्याचं बोलण्याचं, अभिव्यक्तीचं, स्वातंत्र्य देणारं संविधान बदलविणं क्रमप्राप्त आहे.म्हणून कधी नव्हे इतक्या उघडपणे ते संविधान बदलवून आम्हाला इथे तथाकथित हिंदुराष्ट्र निर्मीण करायच आहे असा जोरदार प्रचार प्रसार सुरू आहे. आपल्याला माहीतच आहे की,गेली २००० वर्ष मनुच्या कायद्याने या देशातील बहुजन समाजाला लुळं पांगळं करून ठेवलेलं होतं. लकवा मारल्यासारखा हा सारा बहुजन समाज सुन्न पडलेला होता. जीभ असूनही तो बोलू शकत नव्हता. डोळे असूनही त्याला सत्याचे दर्शन होत नव्हतं. कान असूनही तो ज्ञान ग्रहण करू शकत नव्हता. याचं कारण म्हणजे ह्या सगळ्यांचं सारथ्य करणारा त्याचा मेंदू इथल्या मनुवादी ब्राह्मणी धर्म व्यवस्थेने गुलाम करून टाकला होता. तथाकथित हिंदूराष्ट्राचा अर्थ म्हणजे तुम्ही तुमची प्रतिभा वापरायची नाही. जो आपली प्रतिभा वापरत नाही तो मूर्तीमंत पशुच होय. माणसाने बुद्धी वापरावी| रूपांतरे व्यवहारी आणावी| बिघडली घडी दुरुस्त करावी| समाजाची ग्रामगीता| राष्ट्रसंतासहित आमच्या सगळ्या संतांनी आणि सुधारकांनी सर्वसामान्य जनतेचा विवेक म्हणजेच त्यांची बुद्धी जागृत करण्याचे अत्यंत महत्त्वाचं प्रबोधनाचं काम केलेलं आहे. गेल्या दहा लाख वर्षाचा माणसाचा प्रवास हा थक्क करणारा आहे. इतर प्राण्यांपेक्षा माणसाला लाभलेली प्रतिभा त्याचा मेंदू हे निसर्गाने दिलेलं त्याला सगळ्यात मोठे वरदान. याच प्रगत मेंदूच्या आधारावर गेल्या शंभर वर्षांमध्ये माणसाने प्रगतीचं सर्वोच्च शिखर गाठलेलं आपण पाहतो. मग ९लाख ९९हजार ९०० वर्ष एवढ्या प्रचंड मोठ्या काळामध्ये जी प्रगती आपण करू शकलो नाही ती प्रगती आपण अवघ्या शंभर वर्षांमध्ये करुन दाखवली याचे कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून आपल्याला दिलेला वैज्ञानिक दृष्टिकोन अर्थात चिकित्सा करण्याची आणि सुधारणा घडवून आणण्याची मनोवृत्ती आपण विकसित केली पाहिजे हा होय. ही चिकित्सा करण्याची अर्थात सुधारणा घडवून आणण्याची मनोवृत्ती जी आपल्या संविधानाची देण आहे आणि म्हणून जोपर्यंत संविधान आहे तोपर्यंत या देशात या हिंदू राष्ट्रवाद्यांना हवं असलेलं मनुच्या कायद्याचं हिंदुराष्ट्र कधीही आणता येणार नाही. मनू चा कायदा आपल्याला काय सांगतो संशयात्मे विनाशती अर्थात संशय घ्याल तर नरकात जाल. कुठल्याही स्थितीत चिकित्सा करायची नाही. म्हणजे आपण आपली प्रतिभा आपली बुद्धी आपला



मेंदू वापरायचा नाही. मेंदूला गुलाम करून टाकणारे धर्मग्रंथातील हे कायदे इथल्या बहुजन समाजाला एकच सांगत होते आणि तो मंत्र होता गप्प बसा म्हणून हा सारा बहुजन समाज २००० वर्ष आंधळा मुका आणि बहिरा होता. त्याला कुठल्याही संवेदना नव्हत्या. मनूचा कायदा हा विषमता मुलक आहे आणि म्हणून स्त्रियांनी केलेली प्रगती या मनुवाद्यांच्या डोळ्यांमध्ये सलत आहे. खूपत आहे. ती त्यांना स्वस्त बसू देत नाही. नवरा मेला की तिने जिवंतपणी चितेवर लेटून स्वतःला अग्नीच्या स्वाधीन करत तडफडत तडफडत मरण पत्करणे आणि स्वतःची राख करून घेऊन आपलं अस्तित्व संपवून सतीची झुल पांगरण्यातच तुझा धर्म आहे असं सांगणारा आणि पत्नी मेल्यानंतर तिची राख थंडी होत नाही तोच पतीने दुसरे लग्न करण्याची मुभा देणारा विषमता मुलक ब्राह्मणी धर्म हा हिंदू धर्म असू शकतो का ? असा प्रश्न आपल्याला पडला पाहिजे. आणि म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी इथल्या हावरट लिंग पिसाट मनुवादी ब्राह्मणी धर्म व्यवस्थेने तयार केलेला बहुपत्नीकत्वाचा कायदा रद्द करून एक पत्नीकत्वाचा कायदा केला आणि भारतातल्या संबंध स्त्रियांना आश्वासक संरक्षण दिले. हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून पतीच्या संपत्तीत आणि पित्याच्या संपत्तीमध्ये वाटा मिळवून दिला. भारतातील 50% लोकसंख्या असणाऱ्या स्त्रियांना संरक्षण देणारं संविधान यांना का बदलवायचं आहे ? या स्त्रिया हिंदू नाही का ? आणि म्हणून हिंदू हा शब्द बहुसंख्य लोकांमध्ये भ्रम निर्माण करण्यासाठी वापरल्या जात आहे. खऱ्या अर्थाने त्यांना बहुसंख्य हिंदूंचं कल्याणकारी राज्य निर्माण करायचं नसून मुठभर चंगळवादी ब्राह्मणी धर्म व्यवस्थेचं मूलक असणारं मनूच्या कायद्याचं राज्य आणायचं आहे. आणि त्याला त्यांनी हिंदू राष्ट्र हे गोड नाव दिलेलं आहे. हे आपण समजून घेतलं पाहिजे.

भारत देशामध्ये जर हिंदूराष्ट्र आणायचं असेल तर बिनडोक भक्तांची फौज निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. व्हाट्सअप युनिव्हर्सिटीच्या माध्यमातून तसेंच गुलाम प्रिंट आणि डिजिटल मीडियाच्या माध्यमातून हे काम अत्यंत जोरात सुरू आहे. हे बिनडोक भक्त आपल्या अनुभवाचे एकही अक्षर शेअर न करता आयटी सेलने निर्माण केलेले मेसेज फॉरवर्ड करण्यातच स्वतःला धन्य समजणारे स्वतःची बुद्धी न वापरण्यात धन्यता मानणारे आणि त्यातच स्वाभिमान बाळगणारे असुन अशा लोकांनी बनलेला समाजच खऱ्या अर्थाने गुलामांचा देश असतो माझ्याकडे एक अंधभक्त आला आणि मला काहीही न विचारता काहीही ऐकून न घेता बोलत राहिला. शेतकऱ्याचे प्रश्न संपणारे नाही. शेतमालाला कधीही भाव मिळणार नाही. सरकारी अधिकारी काम करत नाही म्हणून पूर्ण खाजगीकरण झालं पाहिजे. पेट्रोल पाचशे रुपये लिटर असायला पाहिजे. कारण आपल्याला हिंदू राष्ट्र निर्माण करायचं आहे. त्यासाठी पडेल ते कष्ट आणि होईल तेवढा त्याग आपण केला पाहिजे. प्रसंगी मुरमुरे खाऊन राहायची वेळ आली तरी चालेल. एवढेच काय तर जगताच येत नसेल तर मंगळावर राहायला जा. याच पद्धतीने धर्मपंडित बहुसंख्य हिंदू बांधवांना सांगायचे. या जन्मामध्ये असणाऱ्या दुःखाचं कारण मागच्या जन्मात केलेलं पाप आहे. म्हणून वाट्याला आलेलं दुःख निमुटपणे सहन करणे हा तुमचा धर्म जर तुम्ही पाळला तर पुढच्या जन्मात तुम्हाला सुखाची प्राप्ती होईल. म्हणजे वास्तविक जीवनात सुखी होण्याचे सगळे दरवाजे या मनुवादी धर्मपंडितांनी बंद केले होते. पारलौकिक सुखाचं म्हणजे मोक्षाचे स्वप्न दाखवून त्याला गप्प केलं होतं. आज ज्या जनतेच्या समस्या आहेत महागाई, बेरोजगारी याला जबाबदार आमचे आजचे राज्यकर्ते आहे. एक लोक कल्याणकारी राज्य निर्मिती करण्यासाठी ते सपशेल अपयशी ठरलेले आहे. त्यासाठी लागणारे कर्तृत्व आणि नैतिकता त्यांच्याकडे नाही. आपलं अपयश झाकण्यासाठी वरील समस्येविषयी ब्र ही न काढणारा समाज त्यांना हवा आहे आणि त्यासाठी त्यांनी त्याला दाखवलेलं आहे , हिंदू राष्ट्राचे स्वप्न ! अर्थात बोंबलू नको लेका गप्प न !

# गौतमी पाटलांच्या 'अदांनी' धर्माबादकर होणार 'घायाळ'

## आकाश रेड्डी येताळकर यांच्या वाढदिवसानिमित्त मोंढा मैदानावर जंगी कार्यक्रम


आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** गौतमीच्या अदावर सध्या राज्यातील तरुणाई फिदा असून याच आपल्या नटखट अदानी धर्माबादकारांना घायाळ करण्यासाठी शनिवारी ( ता.१७ ) धर्माबादच्या मोंढा मैदानावर गौतमी पाटील अवतरणार आहे. सदर सांस्कृतिक उपक्रम शिवसेनेचे ( शिंदे गट ) नांदेड जिल्हा सहसंपर्क प्रमुख आकाश रेड्डी येताळकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या मित्रमंडळींनी आयोजित केला असून या कार्यक्रमासाठी हिंगोलीचे खासदार हेमंत पाटील, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आनंदराव जाधव, जिल्हाप्रमुख उमेश मुंढे, आनंदराव बोंढारकर यासह शिवसेनेचे अनेक नेते उपास्थित राहणार आहेत अशी माहिती आकाश रेड्डी यांनी आधुनिक केसरीला दिली. राज्यातील सांस्कृतिक कला तारांगनातील गौतमी पाटील हे चमचमता तारा आहे.

उत्तर महाराष्ट्रातील ग्रामीण भागात जन्म घेतलेल्या गौतमी पाटलांचा टिक टॉक, फेसबुक रील ते राज्यातील प्रमुख नृत्यंगणा हा प्रवास थक्क करणारा आहे. शिवसेनेचे नांदेड जिल्हा सहसंपर्क प्रमुख आकाश रेड्डी यांनी आज पर्यंत विविध सेलिब्रेटीना धर्माबादमध्ये आणून सांस्कृतिक कलेची मेजवानी दिली आहे.त्यांच्या मातोश्री नांदेड जिल्हा परिषद उपाध्यक्ष असताना तालुक्यात शेकडो कोटी रुपयांचा निधी आणून तालुक्याच्या विकासात भर टाकली आहे. शिवसेनेच्या फुटी नंतर आकाश रेड्डी यांनी त्यांचे राजकीय गुरु खासदार हेमंत पाटील यांच्यासह शिंदे गटात सामील झाले. त्यामुळे तालुक्याची व विधानसभेचे बरेच समीकरण बदललेले असून यंदा व पुढच्या वर्षी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था, लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्शवभूमीवर गौतमी पाटलांच्या लावणीचा कार्यक्रम आयोजित करून काही नवा राजकीय 'बार' उडवीला जाणार का ? याविषयी चर्चा रंगत आहेत.





माझ्या वाढदिवसाच्या निमित्ताने मित्रमंडळीच्या वतीने विविध उपक्रम आयोजित केले असून गौतमी पाटलांच्या सांस्कृतिक मेजवानीसह गरजू शालेय विद्यार्थ्यांना १००० पॅडचे वाटप केले जाणार आहे . तसेच महिलांच्या हातांना रोजगार मिळावा यासाठी शिलाई मशीन वितरण केले जाणार आहे .लोकांकडून मिळणाऱ्या या प्रेमाबद्दल मी आभारी आहे .

**– आकाश रेड्डी येताळकर,**
**शिवसेना, सहसंपर्क प्रमुख, नांदेड**

गौतमी पाटील यांच्या कार्यक्रमाला जास्तीत जास्त लोक उपस्थित राहावे . **दिगंबर पा . जगदंबे**

# नूतन तहसीलदार स्वरूप कंकाळ यांनी स्वीकारला पदभार; कर्मचाऱ्यांकडून सत्कार

आधुनिक केसरी न्यूज




**खुलताबाद :** तहसील कार्यालयात नूतन तहसीलदार स्वरूप कंकाळ यांनी मंगळवारी आपल्या पदाची सूत्रे स्वीकारली. यावेळी त्यांचा कर्मचारी संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. खुलताबादचे तहसीलदार सुरेंद्र देशमुख यांची सिन्नर जिल्हा नाशिक येथे बदली झाल्याने त्यांच्या जागी जाफराबाद येथील तहसीलदार स्वरूप कंकाळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. रूजू होताच तहसीलदार कंकाळ यांचा नायब तहसीलदार प्रमोद सावंत, अव्वल कारकून एस. एस. शेख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी अव्वल कारकून भारती कुलकर्णी, महसूल सहाय्यक बी. बी. सोनवणे, विनेश राजपूत, संदीप दहातोंडे, संजय भुंगे, अथर्व चौधरी, विलास वाहूळ, अनील घोरपडे, संगणक परिचालक भगवान घुसळे, जनार्धन औटे, सुनिता मुरकुंडे, कारभारी घुसळे, राहुल घुसळे, भारती साबणे, सोमीनाथ अंभोरे आदी उपस्थित होते. तहसीलदार कंकाळ यांनी पदभार स्वीकारताच तलाठी, मंडळ अधिकारी यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना विविध सुचना केल्या.




# शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** छत्रपती श्री अग्रसेन महाराज हायस्कूल येथे शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले या ठिकाणी शाळेच्या पहिल्याच दिवशी असंख्य विद्यार्थी मोठ्या उत्साहात हजेरी लावली व शिक्षकांनी त्यांच्या करमणुकीसाठी त्यांच्या डोक्यावर चित्रीकरण केलेले टोप लावून व त्यांना चॉकलेट देऊन मानसन्मान देण्यात आला या शाळेचे मुख्याध्यापक मोरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी वर्ग योजना ही आखण्यात आली. या ठिकाणी उपस्थित मुख्याध्यापक दिनेश मोरे, उपमुख्याध्यापक श्री प्रणव कोतवाल, शरद खैरनार, कांतीलाल,चौधरी, सुनील परदेशी, दत्तू गोवेकर, सतीश चौधरी, श्रीमती सुनिता रामीकर, श्रीमती रोशना साळवी, श्रीमती सरला पवार, श्रीमती स्मिता कबाडे, श्रीमती हेमा गावित, वैशाली ठाकरे इत्यादी उपस्थित होते.



# नारायण देव बाबा दिंडीचे भव्य स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**प्रकाश लकडे**

**दौलताबाद :** देवगिरी माळीवाडा येथे वाकी च्या नारायण देव बाबा यांच्या पायी दिंडीचे भव्य स्वागत. महाराष्ट्र भरातून हजारो दिंड्या महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यातून पंढरपूरच्या दिशीने पांडुरंग दर्शना करता रवाना झाल्या आहेत. यातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील श्री क्षेत्र वाकी कन्नड येथील नारायण देव बाबा यांची पायी दिंडी पंढरपूरकडे प्रस्थान करत असताना श्री क्षेत्र देवगिरी चहाव पाण्याचीसोय करण्यात आली होती. माळीवाडा येथे दिडी चे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी टाळ मृदंग च्या गजरात एकनाथ नामदेव तुकाराम, ज्ञानोबा माऊलीच्या जय घोषाणे माळीवाडा परिसर दुमदुमूला होता. दि 14बुधवार रोजी श्री क्षेत्र वाकी( देवीची ) येथील नारायण देव बाबांच्या पायी दिंडीचे 23 वे वर्ष असून दरवर्षीप्रमाणे माळीवाडा येथे चंद्रकात हेकडे हे 23 वर्षांपासून या दिंडीचे स्वागत व वारकऱ्यांची भोजन व्यवस्था करतात. यावेळी चंद्रकांत हेकडे व शोभा हेकडे यांनी परिवारासह दिंडीसोबत असलेल्या अश्वाचे व रथाचे पूजन केले. दिंडी चालक शिवेश्वर देवस्थानचे उत्तराधिकारी ह.प.भ. नामदेव महाराज यांचे पूजन व सत्कार केला. योगिनी एकादशी असल्याने फराळ करून वारकरी पुढील प्रवासाला निघाले. यावेळी चंद्रकांत हेकडे, राजू हेकडे, संजय पुंड, सुरेश हेकडे, नामदेव देवतकर, दिलीप पाथरे, सुधाकर हेकडे, दिपक कोथिंबीरे, कडु किर्तीकर, सचिन हेकडे, नारायण मुळे, कैलास नाईक, शिवा धनायत, आसाराम हेकडे, माळीवाडा सरपंच आनिता हेकडे, शोभाताई हेकडे, आनिता देवतकर, वैजिनाथ हेकडे, नंदकुमार जाधव, भानुदास गाजरे, कारभारी जाधव, रामचंद्र बडेकर, रामराव मुळे आदी उपस्थित होते. यासह परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २०० ब्रास वाळूसाठा वर्धा येथे जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** स्वस्त वाळूचे दुकान सुरू होवूनही काळा बाजार थांबत नसल्याचे चित्र आहे. याची कुणकुण लागताच जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी गोपनीय माहिती घेणे सुरू केले. हिंगणघाट येथे मोहता मील परिसरात अवैधपणे साठवलेला वाळू साठा असल्याची माहिती त्यांना मिळाली. गोपनिय माहिती प्राप्त झाल्यानंतर अप्पर जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले यांच्या पथकाने कारवाई केली. सर्व साठा जप्त करुन तहसिलदाराच्या ताब्यात देण्यात आला आहे. यातील दोषी व्यक्तींविरुध्द गुन्हे दाखल करण्याची कारवाई सुरु आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी अप्पर जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले यांच्या पथकास हिंगणघाट येथे जावून तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार नरेंद्र फुलझेले व त्यांच्या पथकातील नायब तहसिलदार अतुल रासपायले, अव्वल कारकुन अमोल उगेवार यांनी तातडीने ही कारवाई केली. हिंगणघाट येथे पोहोचल्यानंतर उपविभागीय अधिकारी शिल्पा सोनाले व तहसिलदार सतिश मासाळ यांना कारवाईत सहभागी करुन घेण्यात आले. अप्पर जिल्हाधिकाऱ्यांचे पथक मील परिसरात पोहोचल्यानंतर तेथे ठिकठिकाणी अवैधपणे वाळू साठविल्याचे आढळून आले.





# खानापूर येथील उपसा सिंचन योजनेची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** आमदार मोनिका राजळे यांनी तालुक्यातील ताजनापूर येथील उपसा सिंचन योजना टप्पा 2 चे खानापूर येथील मुख्य पंपगृह, कळयंत्र आवार, स्थापत्य विभाग विद्युत विभाग, यांत्रिकी कामाची, तसेच पाईप वितरण व्यवस्था विभागांची आज पाहणी केली. तसेच या योजनेवर असलेले वितरण कुंडाची पाहणी करून तातडीने कामे पूर्ण करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या.

यावेळी मध्यम प्रकल्प नगर कार्यकारी अभियंता के. एल. मासाळ, यांत्रिकी विभाग कार्यकारी अभियंता अजिंक्य थोरात, ताजनापूर प्रकल्प उपविभागीय अधिकारी एस. यू. कुलकर्णी, विद्युत विभाग उपविभागीय अधिकारी एस बी माळी, संबंधित ठेकेदार तसेच भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. ताजनापूर उपसा सिंचन योजना हा पायलेट प्रोजेक्ट असून टप्पा 2 चे मुख्यपंपगृह, विद्युत कामे पूर्ण झाली आहेत, तसेच चापडगाव, नजीक बाभूळगाव, सोनेसांगवी, तसेच गदेवाडी येथील दोन वितरण कुंडाची कामे जवळपास पूर्ण झाली आहेत. मागील काळात प्रोजेक्टचे डिझाईन तसेच भूसंपादन यासाठी बरेच कालावधी गेला, सन २०१४ पासून या योजनेसाठी शासनाच्या माध्यमातून मोठा निधी आणला आहे, मागील आर्थिक वर्षात योजनेसाठी १८ कोटीची तरतूद करण्यात आली ती कामे आता पूर्ण झाली, असून यावर्षी ३६ कोटी रुपयांची तरतूद असून सदर कामे चालू आहेत. मार्च २०२४ पर्यंत शेतकऱ्यांना प्रत्यक्षात लाभ देण्यास सुरुवात होईल, तसेच आगामी काही दिवसांत ताजनापुर उपसा सिंचन योजना टप्पा दोन योजना पूर्णत्वास नेण्याचा आपला मानस असल्याचे आ. मोनिकाताई राजळे यांनी सांगितले.

# कोट्यवधींची उपकरणे धूळखात पडून

## प्राथमिक आरोग्य केंद्राची अवस्था अत्यंत दयनीय

आधुनिक केसरी न्यूज

**दीपक माळी**

**जत/ सांगली :** वळसंग (ता.जत) येथिल प्राथमिक आरोग्य केंद्राची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. प्रशासनाकडून या आरोग्य केंद्राच्या डागडूजीचे काम ठेकेदारामार्फत सुरू आहे पण हे करत असताना दवाखान्यातील कोट्यावधींची उपकरणे व साहित्ये उघड्यावर टाकण्यात आली आहेत. त्यामुळे या साहित्यांची प्रचंड प्रमाणात नासधूस झाली आहे. आरोग्य केंद्रात कर्मचारी वर्गाची कमतरता असल्याने दवाखान्यात रूग्णांना उपचार नाहीच्या गणनेत मिळत आहेत. कर्मचाऱ्यांकडून रूग्णाना सरळ दवाखान्याचे काम सुरू आहे त्यामुळे पुढे जावा असा सल्ला दिला जात आहे. मुळात दवाखान्याचा मोठ्या प्रमाणात दुरूस्तीची काम सुरू असताना दवाखाना पर्यायी जागेत सुरू करणे अपेक्षीत होते व दवाखान्यातील महागडे साहित्य व्यवस्थित काळजीपुर्वक दुसऱ्या जागेत स्थलांतर करणे गरजेचे असताना याकडे जाणिवपुर्वक दुर्लक्ष करण्यात आले आहे. ठेकेदाराकडून कामही दर्जाहीन पध्दतीने सुरू असल्याचे तक्रारी होत आहेत. बांधकामास पुरेसे पाण्याचा वापर करण्यात येत नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहे. ठेकेदाराकडून काम दर्जाहीन पध्दतीचे सुरू आहे. त्यामुळे या कामाची संबधीत विभागाने चौकशी करावी, अशी मागणी होत आहे. नागरिकांच्या तक्रारीवरून वळसंग येथिल संबधित दवाखान्याची पाहणी केली असता दवाखान्यातील सर्व साहित्य अस्ताव्यस्त अवस्थेत टाकल्याचे दिसून आले. पाहणीत सरकारी आरोग्य सेवेचा बोजवारा उडाल्याचे चित्र दिसत आहे. ग्रामीण भागात उप जिल्हा रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रांत केलेल्या स्टिंग ऑपरेशनमध्ये ग्रामिण भागातील आरोग्य व्यवस्था पुरती कोलमडलेली दिसत आहे. राज्य सरकार, केंद्र सरकार आणि जिल्हा परिषद दरवर्षी सरकारी आरोग्य सेवेवर कोट्यवधी रुपयांचा चुराडा करते. मात्र, त्याचा लाभ गरजवंतांना मिळणार नसेल, वेळेवर रुग्णांना आरोग्य सुविधा मिळणार नसतील तर त्याचा उपयोग काय ? असा सवाल उपस्थित झाला आहे. जिल्हा सरकारी रुग्णालयापासून खेडेगावापर्यंत जागोजागी सरकारी आरोग्य यंत्रणेचे जाळे निर्माण करण्यात आलेले आहे. मात्र, हे जाळे कधीच विरले असून सर्वसामान्यांना आरोग्य सेवेसाठी खासगी ठिकाणी उंबरे झिजवण्याची वेळ आली आहे. तालूक्यात जवळजवळ सर्वच ठिकाणी मनुष्यबळाचा अभाव आहे.उपचाराऐवजी रुग्णाला रेफर करण्यावर जास्त भर दिला जात आहे. वळसंग आरोग्य केंद्रात रूग्णांना बेड नाही, बेडवरच्या गाद्या गायब आहेत. दवाखान्यातील साहित्य उघड्यावर टाकण्यात आल्या आहेत. दवाखान्यात रूग्ण गेल्यास कुठे एखाद्या कबाडखान्यात आल्यासारखे वाटावे अशी अवस्था वळसंग प्राथमिक आरोग्य केंद्राची बनलेली आहे. जिल्ह्यातील आरोग्य सुधारण्यासाठी जिल्हा परिषदेचे प्रयत्न सुरू आहेत. अनेक ठिकाणी पदे रिक्त असल्याने अडचणी येत आहेत. रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे.त्यामुळे तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र सध्या रुग्णांच्या वाढत्या गर्दीने हाऊसफुल्ल झाली आहेत. मात्र वैद्यकीय अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या, अत्यावश्यक औषधींचा तुटवडा, इतर आवश्यक सोयी सुविधांची वाणवा तसेच आंतररुग्ण व बाह्यरुग्ण विभागाबाबत संबंधितांचे होणारे दुर्लक्ष या सर्व कारणांमुळे तालुक्याची आरोग्य यंत्रणा सलाईनवर असल्याचे दिसत आहे. कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या तसेच आरोग्य सुविधांचा मोठ्या प्रमाणात जाणवणारा अभाव यामुळे तालुक्यातील आरोग्यसेवा रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी असून अडचण, नसून खोळंबा पद्धतीची बनल्याच्या तक्रारी आहेत. रात्रीच्या वेळी एकच महिला कर्मचारी मुक्कामी असते. इतर वेळी रूग्णांना औषधे उपलब्ध नाहीत असे सांगून बाहेरून औषधे आणावयास सांगितले जाते. वळसंग आरोग्य उपकेंद्रात एकूण 12 गावांचा समावेश आहे मात्र उपचारच होत नसल्याने येथिल रूग्णांना नाईलाजाने खाजगी दवाखान्यात उपचार घ्यावे लागत आहे.





दवाखान्यातील सर्व साहित्य उघड्यावर टाकले गेल्याने लाखोंचे नुकसान ठेकेदारामार्फत झाले आहे याची जबाबदारी मात्र कोणीच घ्यायला तयार नाहीत . याबाबत विचारणा केली असता ठेकेदार आरोग्य विभागास कारणीभूत ठरवत आहे तर आरोग्य विभाग संबधित ठेकेदारास जबाबदार ठरवित आहे . त्यामुळे याठिकाणी होत असलेल्या गलथान कारभाराची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी करण्यात येत आहे .



# रक्तदाता दिनानिमित्त व सुमित पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त ३१ दात्यांचे रक्तदान

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** रक्तदातादिनाचे औचित्य साधून व समाजसेवक सुमित पंडित यांच्या वाढदिवसानिमित्ताने शासकीय रक्तपेढी घाटी येथे भव्य रक्तदान शिबिर घेन्यात आले. शासकीय रुग्णालयातील रुग्णांच्या नातेवाईकांना भरतभाऊ कल्यानकर याच्यां तर्फे अन्नदानाचे वाटप करण्यात आले. माणुसकी रुग्णसेवा समूहातर्फे आयोजित भव्य रक्तदान शिबिरात ३१ दात्यांनी रक्तदान केले. उदघाटक म्हणूनडॉ.संजय राठोड सर अधिष्ठाता घाटी, डॉ. आनंद कल्यानकर अधीक्षक, डॉ.कैलास झिने सर, डॉ. भारत सोनवणे,डॉ.जोशी सर, डॉ.जोशी सर, साधना गंगावणे, शेरे मॅडम, सुनिता बनकर यांनी गाडगेमहाराजांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करुन रक्तदान शिबिराचे उद्घाटन करुन कार्यक्रमाची सुरवात केली. उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, कुठलाही वाज्यागाज्या न करता जे सामाजिक कार्य माणुसकी समुहातर्फे जे सामाजिक कार्य तुम्ही करत आहात ते मानवीय कार्य सर्वोत्तम आहे. या रक्तदान शिबिरात उद्घाटक म्हणून लाभलेले डॉ. कैलास झिने यांनी देखील रक्तदान केले. त्यासह डॉ. संदीप देशमुख, डॉ.मोसिन रफिक,समाजसेवक सुमित पंडित, सोमनाथ स्वभावणे ज्युनिअर चार्ली, डॉ. सुनंदिनी दास, पुष्पा घुगे, नरेंद्र भालेराव, प्रकाश घुगरे पोलीस, राहुल सावरगावे, विलास ढाकणे, विनोद सोनवणे, देव गोवर, राहुल गायकवाड, माणिक राठोड, रमेश गवळी,सचिन होले, नामदेव देवकाते, मयूर राठोड, भारत वाघमारे, सुनील क्षीरसागर,स्वाध्याय पाटणगोरे, महेश पांढरे, योगेश शेंडगे,विशाल ताठे, अश्वमेध कोटकर, शुभम देशकर, आकाश पवार, राहुल म्हस्के, शाम वाघमारे आदींसह २१ दात्यांनी रक्तदान केले. समाजसेवक सुमित पंडित यांनी जागतिक रक्तदानाविषयी जनजागृती करून लोकांना रक्तदान करण्याचे आव्हान केले. ज्युनिअर चार्ली सोमनाथ स्वभावाने यांनी हि केली रक्तदानिची जनजागृती. हा कार्यक्रमासाठी माणुसकी रुग्णसेवा समूह व्हाट्सअप ग्रुप सदस्यांनी सहकार्य केले.

# श्रीनाथ हायस्कूल येथे विद्यार्थ्यांना २१ तोफांची सलामी

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** शाळेचा पहिला दिवस आनंदाने साजरा करण्यासाठी गुरुवारी श्रीनाथ हायस्कूल येथे विद्यार्थ्यांचे पुष्पहार, नवीन पुस्तके व 21 तोफांची सलामी देऊन स्वागत करण्यात आले. श्रीनाथ हायस्कूल येथून रॅलीला प्रारंभ झाला. विद्यार्थी शाळाबाह्य राहू नयेत यासाठी घोषणा देत शहरामध्ये पालक व विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात आले. यावेळी मूल्य शिक्षण व गुणवत्तेवर आधारीत नाटिका सादर करण्यात आली. विद्यार्थी घडवण्यात पालक, शिक्षक व समाजाची भूमिका यातून मांडण्यात आली. यावेळी विवेकानंद महाविद्यालयाचे कोषाध्यक्ष तुषार शिसोदे, प्राचार्य शंकर वाघमोडे पर्यवेक्षक सुनिल चितळे, रामनाथ कानडे, श्रीधर खरात,रत्नमाला बिसेन, प्रा.संतोष गव्हाणे, प्रा. शिवाजी जगताप, प्रा. प्रवीण गोर्डे यांच्यासह अजित धस, योगेश पाटील, अनंत आवटे, श्रीकांत बांदल, शिवदास निकम, वाल्मीक सानप, अनिल लहाने, शिवशंकर गुरलेवाड, सिकंदर थोरात, संतोष मडके, भाऊसाहेब गलधर, श्रीमती रेखा मस्के, उषा पाटील, कल्याणी बेतवार, रेखा चव्हाण आदी व विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.



हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी) • आम वात उदर रोग • दमा व ॲलर्जी (जुनाट) • चिकन गुनिया • मनोकयीईक आजार
• त्वचा व गुप्त रोग • स्त्रीयांचे आजार • स्थूलपणा, मूळव्याध • वंध्यत्व, संतती प्राप्ती • कॅन्सर सल्ला, मुतखडा
• वजन वाढविणे • वजन कमी करणे • केसांच्या सर्व तक्रारी • लहान मुलांची • स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या
स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
✲ मासिक पाळी अनियमित असणे
✲ हॉर्मोन्स चे असंतुलन
✲ मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
✲ PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
✲ मासिक पाळी बंद होणे
✲ वारंवार गर्भपात होणे
✲ श्वेत प्रदर (पांढरे जाणे)
पुरूषांना होणाऱ्या समस्या
✲ शुक्राणु कमी असणे
✲ शुक्राणुची गती कमी असणे
✲ शुक्राणु स्खलन
✲ स्वप्न दोष
✲ सेक्स इच्छा कमी होणे इ.
फीस - 300 रू.
संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्स्लटींग उपलब्ध
पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.

# स्वातंत्र्याच्या साडेसात दशकातही वारकऱ्यांना शोधावा लागतोय निवारा

## प्रा. डॉ.नामदेव सानप : पालखी मुक्कामी गावात भक्त निवास उभारण्याची मागणी; मुख्यमंत्री शिंदेंना निवेदन देणार

आधुनिक केसरी न्यूज



**बीड :** शांतीब्रह्म श्री संत एकनाथ महाराज यांची पंढरपूर आषाढी वारीच्या यात्रा महोत्सवानिमित्त पैठण ते पंढरपूर पालखी सोहळा गेल्या 425 वर्षापासून अखंड सुरू असून पालखीतील वारकऱ्यांना व पंढरपूरच्या विठ्ठल भक्तांना असंख्य समस्यांना तोंड देत एक एक पाऊल पंढरीच्या दिशेने टाकावा लागत आहे. स्वतंत्र्याच्या साडेसात दशकानंतरही पालखीतील वारकऱ्यांना प्रत्येक गावात निवार्याचा शोध घ्यावा लागत आहे पालखीतील सहभागी वारकऱ्यांना किमान मुक्कामी स्थळी निवासाची सोय व्हावी यासाठी राज्य सरकार द्वारे स्थानिक विकास निधी मधून पालखी मुक्कामी गावी पालखी भक्त निवासस्थान व सर्वांगीण ग्रामीण विकास भवन उभारण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा ,यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना श्रीक्षेत्र संत एकनाथ महाराज संस्थानचे पालखी प्रमुख रघुनाथ महाराज यांच्या नेतृत्वाखाली भेटून निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती प्रा. डॉ.नामदेव सानप यांनी दिली. बीड जिल्ह्यात संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे आगमन १४ जून बुधवारी शिरुर कासार तालुक्यातील राक्षसभूवन या गावी तर १५जून गुरुवारी रायमोहा येथे मुक्कामी आगमन होत आहे. या निमित्ताने प्रा. डॉ. नामदेव सानप यांनी म्हटले आहे की, शांतीब्रह्म श्री संत एकनाथ महाराज यांच्या पालखीला पंढरपूर आषाढी वारीच्या यात्रा महोत्सवात प्रस्थानत्रयी म्हणून ओळखले जाते. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या पालखीच्या बरोबरीचे स्थान संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे महत्त्व आहे. मराठवाडयातील मुख्य वारकरी सांप्रदायाचे केंद्र स्थान असणाऱ्या पैठण येथील संत एकनाथ महाराजांची पालखी गेल्या 425 वर्षापासून अखंड सुरू आहे. या पालखीचा पायी प्रवास पैठण ते पंढरपूर दरम्यान औरंगाबाद ,अहमदनगर ,बीड ,उस्मानाबाद आणि सोलापूर या जिल्ह्यातून अनंत अडचणीवर मात करून सुरू आहे. स्वातंत्र्याच्या 75 वर्षातही पालखी मार्गावरील रस्त्याची सोय होऊ शकली नाही .आजही नाथांच्या पालखीतील नाथ भक्तांची उपेक्षा होत आहे. पैठण ते पंढरपूर हा पालखी मार्ग सुखकर व्हावा म्हणून पालखी मार्ग मंजूर करण्यात आला परंतु त्यातही तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी या रस्त्याला आपल्या सोयीनुसार वळण दिल्याने संपूर्णतः या मार्गाचा फायदा पालखी भक्तांना होऊ शकला नाही. पैठण ते पंढरपूर या पालखीच्या प्रवासात एकूण 18 तर पंढरपूर ते पैठण परतीच्या मार्गात दहा गावात मुक्काम होतो पैकी एकाही गावात या वारकऱ्यांच्या,नाथ भक्तांच्या निवासाची सुरक्षित सोय नाही . वारकऱ्यांना,भक्तांना मिळेल त्या जागेचा आश्रय घ्यावा लागतो वेळ प्रसंगी पाऊस वादळाचाही त्रास सहन करावा लागतो. सकाळी नैसर्गिक प्रात विधी उघड्यावर गावकुसाबाहेर करावे लागतात, परिणामी मुक्कामी गावच्या परिसरात दुर्गंधी निर्माण होते व पालखी भक्तासह गावकऱ्यांचे आरोग्य धोक्यात येते.

**पालखी मार्गाला जोड रस्ते जोडावेत**

संत एकनाथ महाराज यांच्या पालखी मार्गाला पैठण ते पंढरपूर अशी मंजुरी देण्यात आली ही मागणी मंजूर झाली परंतु त्या त्या जिल्ह्यातील तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी या मार्गाला आपल्या सोयीनुसार वळविल्याने पालखी मार्ग मंजूर करण्याचा मूळ उद्देश सफल होऊ शकला नाही आजही पालखीतील भक्तांना डोंगरदऱ्यातून आणि काटी कुपाड्यातून पायी प्रवास करावा लागतो व एक एक पाऊल पंढरपूरच्या दिशेने टाकावा लागत आहे . पालखी मार्गच्या जोड रस्त्याला डाबरी करण्याच्या माध्यमातून मुख्य रस्त्याला जोडण्यात यावी अशी मागणी आता स्थानिक नागरिकाकडून होत आहे .




# पोलिसांनी पकडला आरोपीसह लाखोंचा मुद्देमाल

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** झाशी राणी पुतळ्याजवळील के. व्ही. इंटरप्रायजेस येथील इलेक्ट्रीक दुकानाचे समोर दोन दुचाकीवर आलेले चार अनोळखी महिला एक पुरुष त्यापैकी तीन महिला या फिर्यादी यांचे दुकानात ग्राहक म्हणुन जावुन फिर्यादी यांचे दुकानात कामासाठी असलेले स्टाफ यांना बोलण्यात गुंतवुन ठेवुन दुकानाचे बाहेर थांबलेले एक अनोळखी महिला व एक अनोळखी पुरुष यांचे साहाय्याने दुकानातुन १५,०००/- रुपये किंमतीचा एक पांढरा रंगाचा ब्लु स्टार कंपनीचा, दिड टन, थ्री स्टार इन्वहरटर एअर कंडीशनचे इनडोअर युनिटची चोरी केली होती. तसेच बांबु गल्लीतील अमोल टी. व्ही., देवपुर मधील सिस्टेल क्लास जवळील सौजन्य सेल्स वगैरे मधुन पण अश्या प्रकारचे चोरी झाली होती परिसरातील दुकानातुन इलेक्ट्रीनिक्स वस्तुचे चोरीचे प्रमाण वाढत असल्याने त्या अनुषंगाने मा. पोलीस अधिक्षक श्री. संजय बारकुंड सो यांनी धुळे शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक श्री. आनंद कोकरे यांना प्रतिबंध करणे व गुन्हे उघडकीस आणण्यासाठी सुचित व आदेशित केले होते. त्यावरुन पोलीस निरिक्षक आनंद कोकरे यांचे सुचनाप्रमाणे धुळे शहर पोलीस ठाण्याचे शोध पथकातील कर्मचा-यांनी धुळे शहरातील वेगवेगळया ठिकाणाहुन सी सी टी व्ही फुटेज च्या सहाय्याने संशयित इसम नामे महेश अशोक केवारे हमालमापाडी कृष्णवाडी दत्त मंदिर समोर, धुळे हा चोरीचा १ ) AC, २ )Onida TV, ०३ ) वायरलेस सिस्टीम स्पीकर हे त्याचे ताब्यात असल्याचे निष्पन्न झाल्याने व सदरची इलेक्ट्रॉनिक वस्तु हया ही धुळे शहारातील झाशी राणी चौक के. व्ही. इंटरप्रायजेस, बांबु गल्लीतील अमोल टी. व्ही., तसेच देवपुर मधील सिस्टेल क्लास जवळील सौजन्य सेल्स या दुकानातुन चोरल्याचे निष्पन्न झाल्याने सदर सदरची इलेक्ट्रॉनिक वस्तु चोरी बाबत धुळे शहर पोलीस ठाणे येथे सदर गुन्हयात अटक करुन विश्वासात घेवुन विचारपुस करता त्याने त्याचे जवळील लाल रंगाची टी. व्ही. एस. कंपनीची रोनीन व ग्रे रंगाची ॲक्टीव्हा ६ जी मोपेड या वाहनाचा गुन्हा करतांना वापर केला व त्याचे कडफन इ. त्याचे कडुन एकुण १,९६,४८९/- रुपये किंमतीच्या वस्तु जप्त करण्यात आले आहेत.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधिक्षक संजय बारकुंड सो, मा. अपर पोलीस अधिक्षक किशोर काळे सो, मा. उप. वि. पो. अधि. ऋषीकेश रेड्डी सो यांचे मार्गदर्शनाखाली धुळे शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक आंनद कोकरे यांनी धुळे शहर पोलीस ठाण्याचे शोध पथकातीचे कर्मचारी मच्छीद्र पाटील,गिरासे, प्रसाद वाघ,निलेश पोतदार,गुणवंत पाटील, शिरसाठ, पटाईत, मोरे, कराड, पाटील, सोनगिरे, शेख, मोरे अशांनी केली आहे.

# पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचा किलबिलाट; शिक्षकांनी केले विद्यार्थ्यांचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** उन्हाळ्याची दीर्घ सुट्टी संपल्यानंतर अखेर १५ जून २०२३ रोजी शाळेची घंटा वाजून शाळेचा श्रीगणेशा झाला आहे. पहिल्याच दिवशी शाळेमध्ये विद्यार्थ्यांचा किलबिलाट कानी पडला असून विद्यार्थी गणवेशासह शाळेत दाखल झाल्याचे दिसून आले. शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून मुख्याध्यापक, शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून नवीन शैक्षणिक वर्षांच्या शुभेच्छा देण्यात आल्या. यावर्षीही खासगी शैक्षणिक संस्थांमधील शिक्षकांना विद्यार्थ्यांची जमावाजमव करण्यासाठी मोठी कसरत करावी लागली. त्यासाठी अनेक संस्थांनी शाळा सुरू होण्यापूर्वी कॅम्पिंग चालवले होते . शाळा म्हटले की प्रत्येकाच्या मनात जुन्या आठवणी रेंगाळत असतात शाळेमध्ये अनेक गमती जमती घडत आपण शिक्षण घेत असतो.शाळेतून आपणास अनेक मित्र-मैत्रिणी भेटत असतात. हसत खेळत ज्ञानमंदिरात आपण विद्येचे धडे गिरवत असतो. शाळेच्या माध्यमातून बालकांचा शारीरिक, मानसिक बोद्धीक विकास होण्यास मदत होते. त्यामुळे प्रत्येक बालकास शाळेविषयी आकर्षण असते. राजूरमध्ये अनेक शैक्षणिक संस्था असून परिसरातील विविध ठिकाणाहून विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येत असतात.यावर्षी १५ जूनपासून नवीन शैक्षणिक वर्षास प्रारंभ झाला आहे.त्यामुळे बाजारामध्ये शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याची लगबग विद्यार्थी व पालकांमध्ये दिसून येत आहे. पहिल्या दिवशी लहान मुलांनी पालकांसोबत शाळेत जाणे पसंत केले. तर काही चिमुकल्यांनी आई-वडिलांनी आपल्या सोबत शाळेत बसण्याचा आग्रह धरला.पालक सोडून गेल्यानंतर अनेक चिमुकल्यांच्या डोळ्यात पाणी आल्याचे दिसूनआले. तर काही मुलं हसत खेळत आंनदाने शाळेत पोहचली. कोरोना काळात शाळेमध्ये खंड पडल्याने मोठ्या प्रमाणात मुलांचे शैक्षणिक नुकसान झाले होते.आता मात्र नियमित शाळा सुरू झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासातून उज्ज्वल भविष्य घडवण्याची संधी आहे. परिपाठानंतर नवीन शैक्षणिक वर्षांच्या विद्यार्थ्यास शुभेच्छा देऊन शाळेचा श्रीगणेशा करण्यात आला.

# शेतीवादावर तंटामुक्ती अध्यक्षांनी नजर ठेवावी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सद्यस्थितीत पेरणीचे दिवस सुरू झालेले आहेत शेतकरी आता शेतीकामात मग्न झालेला आहे मात्र यातच काह ठिकाणी शेतीचे जुने वाद व नवीन धुऱ्याचे वाद उफाळून येण्याची शक्यता आहे तर काही ठिकाणी पोलीस स्टेशनला अशा प्रकारचे प्रकरण येण्यास सुरुवात झालेली आहे. सदर छोटे छोटे वाद हे मोठ्या वादात रूपांतर होण्यास वेळ लागत नाही. यामुळे सावळदबारा परिसरातील ग्रामीण भागातील तंटामुक्तीने याकडे लक्ष देणे गरजेचे झाले आहे. जेणेकरून छोटे वादाचे रूपांतर मोठ्या वादात होणार नाही. सोशल मीडियाच्या माध्यमातून काही ठिकाणी व्हायरल व्हिडिओच्या माध्यमातून धुऱ्याच्या वादातून तुंबळ हाणामारी होऊन कुठे काही जणांचा मृत्यू तर काही जण जखमी झाल्याच्या घटना घडल्या असल्याचे दिसून येत आहे धुऱ्याचा छोटासा वाद कोणत्याही क्षणी मोठा होण्यास वेळ लागत नाही. तंटामुक्ती अध्यक्ष किंवा स्थानीय ग्रामपंचायत ने याकडे लक्ष घातल्यास वाद निवळून येऊ शकतात. त्यामुळे भावकीतील वाद संपुष्टात येऊन आपुलकी ही वाढू शकते. यामध्ये पोलिसांनी विविध प्रकारे ग्रामीण भागात या संबंधित जनजागृती कार्यक्रम राबवले तर काही प्रमाणात वाद मिटण्याचेही शक्यता होते. यामुळे शेतीचे सदर वाद मिटवण्यासाठी तंटामुक्ती, ग्रामपंचायत व पोलीस स्टेशनला पुढाकार घेणे गरजेचे आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर